शनिवार, ४ डिसेंबर २०२१
वर्ष १४ ◆ अंक १३७
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

‘ओमायक्रॉन’च्या धास्तीने लसीकरणाला पुन्हा गती/३
आमदार भरत गोगावलेंचा राष्ट्रवादी, शेकापला टोला/५
कसोटीत पहिल्या दिवसअखेर भारत ४ बाद २१४ धावा/६

## राज्य सरकारचे हिटलरशाही पद्धतीने काम –दरेकर



**मुंबई :** सरकार हिटलरशाही पद्धतीने काम करत आहे. सर्व एसटी कर्मचारी विलिनीकरणाच्या मागणीवर ठाम आहेत. परिवहन मंत्र्यांनी यातून समन्वयाने मार्ग काढावा, मेस्माचा बडगा हा अंतिम उपाय नव्हे, असे आवाहन विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी केले. प्रवीण दरेकर यांनी शुक्रवारी (दि. ३) प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. या वेळी दरेकर म्हणाले की, आजही ब्रेन हॅमरेज होऊन एक कर्मचारी गेल्याचे समजत आहे. मी स्वतः राज्यभर फिरतोय. सर्व डेपो कडेकोट बंद आहेत. विलिनीकरण मागणीसाठी जीवाची पर्वा करण्यासही ते मागेपुढे पाहणार नाहीत. अशा वेळेला समन्वयातून मार्ग काढून विषय सोडवणे महत्त्वाचे आहे, याउलट सरकार कारवाई करत आहे. जोरजबरदस्ती आणि सरकारी कायद्याचा इंगा दाखवून मेस्मा अंतर्गत कारवाई करू नये.

# कोकणच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने आढावा घेण्यासाठी गुरुवारी (दि. २) मुंबई भाजप प्रदेश कार्यालयात कोकण विभागातील विविध जिल्ह्यांचे नेते व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी मार्गदर्शन करताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते तथा माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोकणच्या विकासासाठी भाजप कटिबद्ध असल्याची ग्वाही देत जोरदार कामाला लागण्याचे आवाहन केले.

या बैठकीस केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, रायगडचे माजी पालकमंत्री व भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रवींद्र चव्हाण, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सरचिटणीस विनोद साबळे यांच्यासह विविध जिल्ह्यांचे अध्यक्ष व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी इत्यादी जिल्ह्यांतील निवडणुकांसंदर्भात आढावा घेण्यात आला.

रायगड जिल्ह्यातील खालापूर, माणगाव, तळा, म्हसळा, पोलादपूर आणि नव्याने निर्माण झालेल्या पाली या सहा नगरपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीसाठी भाजप सरकारच्या विविध योजना, उपक्रम जनतेपर्यंत पोहचवून यश संपादन करता येईल, अशी भूमिकाच फडणवीस यांनी या वेळी मांडली.

भाजपने विकासकामे व सामाजिक उपक्रम, शिबिरे आयोजित केलेली आहेत. यापुढेही कोकण भागात आदर्श वाटेल असे काम करूया, असे फडणवीस या वेळी म्हणाले.

### कामे करा; अन्यथा कार्यालयाला टाळे ठोकू!

# सभागृह नेते परेश ठाकूर यांचा सिडकोला उद्यापर्यंतचा अल्टीमेटम



**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील तक्रारींबाबत सिडकोच्या अधिकाऱ्यांबरोबर शुक्रवारी (दि. ३) झालेल्या बैठकीत पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवार (दि. ५) सायंकाळपर्यंतचा अल्टीमेटम दिला आहे. मुख्य रस्त्याचे ७० टक्के काम दाखवा नाहीतर सोमवारी (दि. ६) सकाळी सिडको कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा दिला.

नवीन पनवेलमधील तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या सिडको अधिकाऱ्यांना समज देण्यासाठी ६ डिसेंबर रोजी नवीन पनवेल सिडको कार्यालयावर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा नेऊन कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ यांनी दिला होता. त्यामुळे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी (दि. ३) चर्चा करण्यासाठी सभागृह नेते परेश ठाकूर यांना व त्यांच्या शिष्टमंडळाला बोलावले होते. या वेळी नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ, स्थायी समितीचे अध्यक्ष संतोष शेट्टी, नगरसेवक तेजस कांडपिळे, नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, अजित लोंढे, नितीन भुजबळ, किशोर शिंदे, क्रांतीकुमार चितळे, शिवाजी भगत, अक्षय सिंग, सिडकोचे अधीक्षक अभियंता मोहिले, कार्यकारी अभियंता वी. ज्ञा. बनकर, पाणीपुरवठा, विद्युत व बांधकाम खात्याचे अधिकारी उपस्थित होते. (पान २ वर..)

### ‘समस्यांबाबत अधिकाऱ्यांचा अभ्यास नाही’

नवीन पनवेलमधील समस्यांवर चर्चा करताना लक्षात आले की, याबाबत त्यांनी कोणताही अभ्यास केलेला नाही. किती स्ट्रीट लाईट आहेत, गार्डनलाईट आहेत, किती रस्त्यांचे काम झालेले आहे याची माहिती नाही. यातून अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा दिसून येतो. प्रत्यक्ष कोणतेही काम न करता ते फक्त आंदोलन करू नका, असे सांगून चालढकलपणा करीत आहेत. त्यामुळे आम्ही त्यांना आज खडसावून सांगितले की, ६ तारखेपर्यंत प्रगती दिसून आली नाही, तर आम्ही आंदोलन करणारच. तुम्ही लोकांना सांगता येथील सेवा पनवेल महापालिकेकडे हस्तांतर केल्या आहेत तर मग द्या आमच्याकडे अशीही विनंती आम्ही त्यांना केली, असे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सांगितले.

# महाविकास आघाडी सरकार सर्वांत निष्क्रिय सरकार

### ■ भाजप प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांचा घणाघात




**माथेरानमध्ये भाजप पदाधिकाऱ्यांचे प्रशिक्षण शिबिर**

**कर्जत : संतोष पेरणे**

महाराष्ट्रात असलेले तीन पक्षाचे सरकार हे ५० वर्षांतील सर्वांत निष्क्रिय सरकार असल्याचा घणाघात भाजप प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी केला, तसेच आघाडी सरकारच्या ध्येयधोरणाचा विचार करून भाजप राज्यात अधिक आक्रमकपणे सरकारविरुद्ध, प्रसंगी रस्त्यावर उतरून सरकारवर दबाव टाकणार असल्याचे भाजपची भूमिका या वेळी भंडारी यांनी सांगितली. ते माथेरानमध्ये भाजप उत्तर रायगड जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण शिबिरानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. (पान २ वर)

## शिवसेना नेते अडसूळांना मुंबई हायकोर्टाचा दणका



**मुंबई :** मुंबई हायकोर्टाने सिटी सहकारी बँक गैरव्यवहारप्रकरणी शिवसेनेचे नेते आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ यांना मोठा दणका दिला आहे. त्यांचा अटकपूर्व जामीन हायकोर्टाने फेटाळला आहे. मुंबई हायकोर्टाने अडसूळ यांची याचिका गेल्या महिन्यातही फेटाळली होती. त्यांनी अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या एका प्रकरणात हायकोर्टात धाव घेतली होती.

अडसूळ सिटी सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना गैरव्यवहार झाला, अशी तक्रार आमदार रवी राणा यांनी केली होती.

## निवडक

### ‘ओमायक्रॉन’चे महाराष्ट्रात संशयित २८ रुग्ण

**मुंबई :** देशात ‘ओमायक्रॉन’चे दोन रुग्ण सापडल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. महाराष्ट्राच्या शेजारी असलेल्या कर्नाटकात हे दोन रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे राज्याची डोकेदुखी वाढली आहे. त्यात महाराष्ट्रात एकूण २८ ओमायक्रॉन संशयित रुग्ण आढळल्याने ही डोकेदुखी आणखीनच वाढली आहे. त्यातील १० संशयित हे एकट्या मुंबईतील आहेत.

### मनसे अध्यक्ष राज ठाकरे करणार महाराष्ट्र दौरा



**मुंबई :** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे महाराष्ट्र दौऱ्यावर निघणार आहेत. येत्या १४ डिसेंबरपासून या दौऱ्याला सुरुवात होईल. राज्यातील सहा विभागांमध्ये हे दौरे होणार आहेत. त्यांच्या या दौऱ्याच्या आखणीसाठी ‘शिवतीर्थ’वर बैठक झाली, अशी माहिती पक्षाचे नेते बाळा नांदगावकर यांनी दिली. सुरुवातीला मराठवाडा यानंतर पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात असा दौरा असेल.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत पनवेलमध्ये दिव्यांग दिनानिमित्त सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे अपंग क्रांती संघटना व अपंग उत्कर्ष सामाजिक संस्थेच्या वतीने जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सोहळा आयोजित केला होता. या सोहळ्याचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यासोबत मान्यवरांचा सत्कारही करण्यात आला.

या सोहळ्यामध्ये जगातील सर्वांत लहान उंचीचा बॉडी बिल्डर म्हणून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव कोरलेले प्रतिक मोहिते, कळंबोली येथील दिव्यांग वेटलिफ्टर विनोद देवकर, कणकेश्वर पांडुरंग रसाळ यांच्यासह मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला अपंग क्रांती संघटना व अपंग उत्कर्ष सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी. जी. पाटील, पनवेल महापालिकेच्या नगरसेविका विद्या गायकवाड आदी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांना न्याय, मिळायला हवा, प्रत्येकाचा सन्मान व्हायला पाहिजे या दृष्टिकोनातून काम करीत आहेत. मदत ही उपकार म्हणून नाहीतर संकटात सापडलेल्या हातभार लावावा या भावनेतून करण्याची आवश्यकता आहे.



**‘नोकरी-धंद्यामध्ये दिव्यांगांना प्राधान्य देऊ’**

*लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या सोहळ्यात मनोगत व्यक्त केले. या वेळी त्यांनी दिव्यांगांना उद्योग धंद्यामध्ये तसेच नोकरीमध्ये जिथे जिथे तुम्हाला आमची गरज लागेल तिथे आम्ही १०० टक्के प्रामाणिकपणे मदत करू. खासदार, आमदार, महापौर यांच्यासह सर्व लोकप्रतिनिधी यांच्याकडे ज्या ज्या ठिकाणी तुम्ही तुमच्या कामांची मागणी कराल त्या त्या ठिकाणी तुमच्या मागणीचा पहिला विचार करून तुम्हाला मदत करू, असे आश्वासन दिले.*

## महाराष्ट्रात सरकार आहे, मात्र शासन नाही -फडणवीस

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सरकारने जनतेसाठी कुठलेही काम केले नाही. या सरकारने दारूवरील कर कमी केला, पण पेट्रोल-डिझेलवरील दर कमी केला नाही. इथे कुठलेही शासन नाही. जिथे शासन असते तिथे धोरण असते, पण महाराष्ट्रात या दोन्ही गोष्टी नाहीत, असे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले. शुक्रवारी (दि. ३) ते पुणे दौऱ्यावर आहेत. या वेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

महाराष्ट्रातले उद्योग कोणीही कुठे नेऊ शकत नाही, पण हे शासन अपयशी राहिले, तर महाराष्ट्रातील उद्योग नक्की बाहेर जातील, असेही फडणवीस म्हणाले.

## घोटाळेबाज विवेक पाटलांच्या जामीन अर्जावर आता १५ डिसेंबरला सुनावणी

### ■ तळोजा जेलमधील मुक्काम १२ दिवसांनी वाढला



**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी आता १५ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा तळोजा तुरुंगातील मुक्काम आणखी १२ दिवसांनी वाढला आहे.

‘ईडी’ने विवेक पाटील यांना १५ जून २०२१ रोजी पनवेलमधील त्यांच्या राहत्या घरातून अटक केली होती. त्यांचे वकील अशोक मुदरंगी यांनी ११ ऑक्टोबर रोजी त्यांच्या जामिनासाठी न्यायालयासमोर अर्ज केला. त्यावर १४ ऑक्टोबरपासून सुनावणी सुरू होती. त्यांच्या जामीन अर्जावर २५ नोव्हेंबर रोजी निर्णय होणार होता, मात्र ३० नोव्हेंबरपासून त्यावरील सुनावणी रोज पुढे ढकलण्यात येत आहे. गुरुवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी विवेक पाटील यांना न्यायालयासमोर हजर करण्यात आलेले नव्हते. त्यांचे वकील पवनी छद्दा यांनी न्यायालयाकडे पुढील तारखेची मागणी केल्यानुसार शुक्रवारी पुन्हा सुनावणी सुरू झाली. तेव्हा ‘ईडी’तर्फे वकील गोन्साल्वीस, ‘ईडी’चे अधिकारी रोहित कुमार आणि आरोपीचे वकील सुबीर सरकार उपस्थित होते. पुढील सुनावणी १५ डिसेंबर रोजी होईल, असे या वेळी सांगण्यात आले.

|| प्रथम पुण्यस्मरण ||
(रविवार, दि. ५ डिसेंबर २०२१)



माया आपली स्मरते.. येते डोळ्यातुन पाणी.. .
ओठ आजन्म गातील आपल्या आठवणी...!
कै. लक्ष्मण तुकाराम पाटील
विनम्र अभिवादन!
आपले विनित : मे. एल. टी. पाटील अॅण्ड सन्स
व्यवस्थापक : समस्त पाटील परिवार खारकोपर व मोरावे
पत्ता : साई मंदिर खारकोपर, सेक्टर ८, उलवे नोड, नवी मुंबई

# नाशिकमधील मराठी साहित्य संमेलनाला ग्रंथदिंडीने प्रारंभ



**नाशिक : प्रतिनिधी**

कुसुमाग्रज नगरीत आयोजित ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची सुरुवात भव्य ग्रंथदिंडीने करण्यात आली. कविवर्य कुसुमाग्रज प्रतिष्ठान येथून सुरू झालेल्या दिंडीचे नाशिककरांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

या वेळी पारंपरिक वेशभूषा परिधान करून शालेय विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले, लेझीम पथक, वारकरी मंडळी व ढोलताशांच्या गजरात ग्रंथ दिंडीला सुरुवात करण्यात आली. ग्रंथदिंडीच्या पालखीमध्ये भगवतगीता, ज्ञानेश्वरी व कुसुमाग्रजांची साहित्यसंपदा ठेवण्यात आली होती. या वेळी अनेक लेखक, कवी, साहित्यिक, विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व साहित्यप्रेमींनी उपस्थिती लावली होती.

## गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण करण्याचे आदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



**आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाकर जोशी यांच्या प्रयत्नांना यश**

तालुक्यातील ओवे विभागातील पेठपाडा, रांजणपाडा आणि मुर्बीपाडा या पाड्यांचे गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विभागाला दिले असून आता या पाड्यांना महसूल दर्जा प्राप्त होणार आहे. या कामी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपचे पनवेल तालुका संघटक प्रभाकर जोशी यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा कामी आला आहे.

ओवे या मूळ गावठाणाचे सर्वेक्षण झाले होते, मात्र या विभागातील पेठपाडा, रांजणपाडा आणि मुर्बीपाडा या पाड्यांचे गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण अद्याप करण्यात आले नव्हते. (पान २ वर..)

# जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिरात भाजपचे विचारमंथन

**कर्जत : बातमीदार**

बदलत्या राजकीय भूमिका आणि नव्याने उद्‌भवणारे सामाजिक, राजकीय प्रश्न यांना सामोरे जाण्यासाठी कार्यकर्ता सजग असावा म्हणून भारतीय जनता पक्षातर्फे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विविध विषयांवर विचारमंथन करण्यात आले. माथेरान येथे आयोजित प्रशिक्षण शिबिरात उत्तर रायगड जिल्हा भाजप पदाधिकारी उपस्थित होते. या सर्वांना दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात भाजपच्या प्रदेश प्रवक्ते आणि नेत्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

भाजप उत्तर रायगड जिल्हा पदाधिकारी यांचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर माथेरान येथे आयोजित करण्यात आले. माथेरानमधील हॉटेल कुमार प्लाझा येथे २ व ३ डिसेंबर रोजी हे शिबिर झाले. या प्रशिक्षण शिबिरासाठी उत्तर रायगडमधील भाजपच्या विविध सेलचे जिल्हास्तरीय पदाधिकारी यांनाच केवळ निमंत्रित केले होते. त्यामुळे कोणताही गाजावाजा न करता या प्रशिक्षण शिबिरासाठी पदाधिकारी आले होते. प्रशिक्षणाची



सुरुवात उद्‌घाटन सोहळ्याने झाली. या वेळी पनवेल महापालिका महापौर डॉ. कविता चौतमल, महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष अश्विनी पाटील आदी उपस्थित होते. उद्‌घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन भाजप जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी आणि दीपक बेहरे यांनी केले.

पहिल्या सत्रात निवडणूक व्यवस्थापनामध्ये देशात आघाडीवर असलेल्या चाणक्य ग्रुपचे प्रा. राम भोजने यांनी जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर प्रा. भोजने यांनी कार्यकर्त्यांना आणि पदाधिकारी यांना निवडणुका कशा जिंकायच्या या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात देशाचे शेतीधोरण विधेयक आणि गैरसमज या विषयावर जिल्हा भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील यांनी मार्गदर्शन केले. तर राज्यातील राजकीय स्थिती आणि विरोधी पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाची भूमिका या महत्त्वाच्या विषयावर राज्याचे माजी मंत्री आशिष शेलार यांचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांना लाभले. भाजपचे प्रदेश प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी मीडिया, तसेच सोशल मीडिया कार्यपद्धती आणि उपयोग या विषयावर मार्गदर्शन केले.

उरण मतदारसंघाचे आमदार आणि भाजपचे नेते महेश बालदी यांनी भाजप पूर्व इतिहास आणि विकास या विषयावर मार्गदर्शन केले. कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी केंद्र सरकारच्या सात वर्षांच्या कालावधीत केलेला विकास याबाबत मार्गदर्शन केले, तर भाजपचे भटक्या विमुक्त सेलचे प्रदेश अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र पवार यांनी संघटनात्मक रचनेतील पक्षाची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. शेवटी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. माधव भंडारी यांनी सक्षम भारत या विषयावर मार्गदर्शन केले. संपूर्ण प्रशिक्षण शिबिरात भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, विनोद साबळे, दीपक बेहरे यांच्यासह कर्जत तालुका मंडल अध्यक्ष मंगेश म्हसकर, माथेरान अध्यक्ष प्रवीण सकपाळ, माथेरानचे उपनगराध्यक्ष आकाश चौधरी आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

## अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त ८ डिसेंबरला 'कुस्त्यांच्या खुल्या दंगली'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवानिमित्त पनवेल तालुका कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने आणि माजी जिल्हा परिषद सदस्य, भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील व बेलवली विभागीय अध्यक्ष सतीश पाटील यांच्या वतीने ०८ डिसेंबर रोजी 'कुस्त्यांच्या खुल्या दंगली' आयोजित करण्यात आल्या आहेत.



अरुणशेठ भगत यांचा वाढदिवस नुकताच विविध समाजोपयोगी उपक्रमात साजरा झाला. त्यांच्या वाढदिवसानिमित्त या 'कुस्त्यांच्या खुल्या दंगली'चे आयोजन २२ नोव्हेंबरला करण्यात आले होते, मात्र अवकाळी पावसामुळे या दंगली तात्पुरत्या रद्द करण्यात आल्या होत्या. आता ०८ डिसेंबरला दुपारी १.३० वाजता बेलवली–वारदोली येथील माऊली मैदानावर या कुस्त्यांच्या दंगली होणार असून या दंगलीचा कुस्तीप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील व बेलवली विभागीय अध्यक्ष सतीश पाटील यांनी केले आहे.




**पनवेल : ओमायक्रॉन या कोरोनाच्या नव्या प्रकाराला रोखण्याच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करण्यास सुरुवात झाली आहे. त्याअंतर्गत तक्का येथील सुन्नी नुरानी जामा मस्जिदमध्ये शुक्रवारी मास्कचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, मस्जिदचे अध्यक्ष हाजी अब्दुल अझीझ ताडे, युवा सामाजिक कार्यकर्ते आफताब ताडे, जहांगीर ताडे, समद मुकादम, काशिफ शेख, हारून शेख उपस्थित होते.**

पान १ वरून

## सभागृह नेते परेश ठाकूर यांचा सिडकोला उद्यापर्यंतचा अल्टीमेटम

या वेळी नवीन पनवेलमधील गार्डन व स्ट्रीट लाईट, पनवेल स्टेशनजवळील हायमास्टचे लाईट अथवा दिवे वारंवार तक्रार अर्ज करूनसुद्धा न बसवणे, चेंबूर बँकेपासून सेक्टर १५अ पाण्याच्या टाकीपर्यंतचा रस्ता पुन्हा खोदल्यामुळे रस्त्यावर पडलेले खड्डे, कमी दाबाने येणारे पाणी व पाण्याची वेळ कमी करणे या विषयांबाबत सभागृह नेते परेश ठाकूर व नगरसेवकांनी उपस्थित केलेल्या कोणत्याही प्रश्नांना संबंधित अधिकारी उत्तर देऊ शकले नाहीत.

या वेळी नगरसेवकांनी या अधिकाऱ्यांमुळे आम्हाला लोकांचे ऐकावे लागते. सोशल मीडियावर आमच्या नेत्यांबाबत टीका केली जाते अशा तक्रारी केल्या. त्यामुळे परेश ठाकूर यांनी, आपण काम करीत नसाल तर हा भाग महापालिकेकडे हस्तांतरित तरी करायला तुमच्या वरिष्ठांना सांगा, असे सांगून रविवारी सायंकाळपर्यंत आपले काम दिसले नाही, तर नाईलाजाने आम्हाला आपल्या कार्यालयाला टाळे लावावे लागेल, असा इशारा दिला.

नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी याबाबत सांगितले की, सिडकोला आम्ही नवीन पनवेलमधील नगरसेवकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली टाळे ठोकण्याचा इशारा दिल्यावर येथील कार्यकारी अभियंता बनकर यांचे पत्र आले. तुम्ही सुचवलेली काही कामे सुरू झाली आहेत, तर उरलेली लवकरात लवकर करून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत म्हणून आम्हाला चर्चेला बोलावले होते. आमदार पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे येऊ शकले नाहीत. सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली चर्चेला आलो, पण त्यांना तांत्रिक प्रश्नांना उत्तरे देता आली नाहीत. सर्वसामान्य लोकांना कोणती कामे सिडकोकडे आणि कोणती महापालिकेकडे हे माहीत नसल्याने महापालिकेला आणि नगरसेवकांना सिडको अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे बदनामी सहन करावी लागते आहे. आमचे नेते सोमवारी जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल.

## महाविकास आघाडी सरकार सर्वांत निष्क्रिय सरकार

माथेरानमध्ये भाजप उत्तर रायगड जिल्ह्यामधील भाजप आणि भाजपचे २७ सेल यांचे अध्यक्ष, तसेच जिल्हा पदाधिकारी यांचे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. त्या वेळी आयोजित पत्रकार परिषदेत भाजप प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली.

ते म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री दोन वर्षांत मंत्रालयात येत नाहीत आणि मागील २२ दिवस तर रुग्णालयातच आहेत. त्यांना राज्यातील जनतेचे काही देणेघेणे नाही आणि केवळ मुख्यमंत्री यांनाच काळजी नाही, तर राज्य सरकारने असंख्य विक्रम केले असून महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री जेलमध्ये जातो. मुंबईसारख्या महानगराचे पोलीस आयुक्त यांना सरकारला फरारी घोषित करावे लागते, एक पोलीस अधिकारी खंडणी वसूल करतो हे शासनानेच मान्य केले आहे. अशा सरकारचे करायचे काय? हे महाराष्ट्र राज्यातील जनतेने ठरवले आहे. आम्ही राज्यात विरोधी पक्ष म्हणून जनतेशी असलेली बांधिलकी समजून भूमिका आक्रमकपणे बजावत आहोत, मात्र आघाडी सरकारच्या ध्येयधोरणाचा विचार करून भाजप राज्यात अधिक आक्रमकपणे सरकारविरुद्ध प्रसंगी रस्त्यावर उतरून सरकारवर दबाव टाकणार असल्याचे भाजपची भूमिका या वेळी माधव भंडारी यांनी जाहीर केली.

पत्रकार परिषदेत बोलताना भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजपचे हे जिल्हास्तरीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर असून पक्षाच्या सर्व सेलचे अध्यक्ष आणि भाजपचे पदाधिकारी असे १२० प्रमुख कार्यकर्ते यांचा सहभाग होता. कर्जत तालुक्यात शिबिर होत असल्याने आम्ही कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष आणि माथेरानमधील पक्षाचे लोकप्रतिनिधी, प्रमुख पदाधिकारी यांना विशेष निमंत्रित केले होते, अशी माहिती दिली. भाजपची देशापासून गावापर्यंत सत्ता आहे, त्यामुळे आमचा कार्यकर्ता बदलत्या राजकीय, सामाजिक भूमिकेबद्दल सजग असला पाहिजे आणि त्यासाठी हे प्रशिक्षण शिबिर उत्तर रायगड जिल्ह्यातील पदाधिकारी यांच्यासाठी आयोजित केले होते. कर्जत तालुका मंडल अध्यक्ष मंगेश म्हसकर आणि माथेरान शहर भाजप यांनी देखणे आयोजन केल्याबद्दल आभार मानले.

**भाजप माथेरानची सत्ता स्वबळावर मिळविणार** –आमदार प्रशांत ठाकूर

*माथेरानमधील जनतेशी निगडित प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध आहोत आणि त्यांच्यासाठी आम्ही नवी दिल्लीपर्यंत धाव घेतली आहे. माथेरानकरांसाठी अडचणीचे ठरत असलेले कायदे बदलून घेण्यासाठी आम्ही केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू, भाजपला माथेरानकरांना पर्यटन वाढीसाठी ठोस कार्यक्रम राबवायचा आहे. रोजगाराच्या संधी तरुणांना उपलब्ध करून देण्यासाठी कोकणात तरुणांना 'रोजगार उपलब्ध समर्थ कोकण'च्या माध्यमातून उद्योजक उभे केले आहेत. या प्रकल्पाचा माथेरानमध्ये पसारा वाढविण्यासाठी माथेरान भाजपने पुढाकार घ्यावा, असे सांगताना माथेरानमध्ये भाजपची स्वबळावर सत्ता आणणार असल्याचे भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले.*

## गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण करण्याचे आदेश

त्यामुळे प्रभाकर जोशी यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे या संदर्भात मार्गदर्शन घेऊन रायगड जिल्हाधिकारी, भूमिअभिलेख, पनवेल महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे मागणी करून सतत पाठपुरावा केला. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाने ओवे विभागातील पेठपाडा, रांजणपाडा आणि मुर्बीपाडा या पाड्यांचे गावठाण नगर भूमापन सर्वेक्षण करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाने भूमिअभिलेख जिल्हा अधीक्षक यांना दिले आणि त्या अनुषंगाने भूमिअभिलेख जिल्हा अधीक्षक यांनी तत्काळ कार्यवाहीसाठी भूमिअभिलेख पनवेल उपअधीक्षक यांना आदेश दिले आहेत.

या सर्वेक्षणामुळे या तिन्ही पाड्यांना महसुली गावाचा दर्जा प्राप्त होणार असून येथील नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर व प्रभाकर जोशी यांना धन्यवाद देऊन त्यांचे आभार मानले.

## भाजपच्या विश्रांती घरत यांची कौतुकास्पद कामगिरी

**उरण : वार्ताहर**

आदिवासी वाडीतील सहा वर्षे वयाच्या जन्मांध अनाथ मुलाला दृष्टी येण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या उरण तालुक्यातील चिरले गावातील भाजप जासई विभाग अध्यक्ष विश्रांती रमाकांत घरत यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

उरण तालुक्यातील चिरले गावाजवळील गावठाण बोरकीची आदिवासी वाडी येथे राहणारा सहा वर्षे वयाचा अनाथ मुलगा मंगेश रवी कातकरी याला त्याच्या जन्मापासूनच दोन्ही डोळ्यांना दिसत नाही. त्या मुलाला दृष्टी यावी, त्याला सुंदर जग दिसावे याकरिता भाजप जासई विभाग अध्यक्ष विश्रांती रमाकांत घरत यांनी पनवेल येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. हळदीपूरकर यांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आय हॉस्पिटल येथे



नेऊन दोन्ही डोळ्यांची तपासणी केली व औषधोपचार केले. डॉक्टरांनी मुलाचे वय कमी असल्याने पुढील काळात ऑपरेशन करून त्याला दृष्टी येईल, असे सांगितले आहे. या वेळी भाजप जासई विभाग अध्यक्ष विश्रांती रमाकांत घरत, रमाकांत घरत, किरण मढवी (उलवे), दिनेश पाटील (बेलवले) आदी उपस्थित होते.

## पंडित उमेश चौधरी यांची शास्त्रीय संगीत मैफल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक, रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय संगीत गायनाची मैफल रोटरी क्लब ऑफ वाईच्या वतीने रविवारी (दि. ५) वाई (सातारा) येथे आयोजित करण्यात आली आहे.



पंडित सदाशिव पवार स्मृतिदिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ वाई यांच्या वतीने रायगड जिल्ह्यातील शास्त्रीय संगीताची शान असलेले पंडित उमेश चौधरी यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम लोकमान्य टिळक स्मारक संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. त्यांना तबल्यावर निषाद पवार, हार्मोनियमवर सुरेश फडतरे, पखवाजावर किरण भोईर, तर गायन साथ मंगेश चौधरी आणि अक्षय चौधरी यांची असणार आहे. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीच्या डिस्ट्रीक्ट गव्हर्नर स्वाती हेरकळ, तर विशेष उपस्थिती उस्ताद अजीम खान यांची असणार आहे.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने सुरू असलेल्या मासिक संगीत सभेच्या माध्यमातून पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष म्हणून उमेश चौधरी यांनी शेकडो कलाकारांना व्यासपीठ मिळवून दिले आहे.


**पनवेल महानगर पालिका**
**महिला व बाल कल्याण विभाग**
**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागातर्फे कोरोना या संसर्गामुळे ज्या महिलांचे पती निधन पावले आहेत अशा (एकल) महिलांना अर्थसहाय्य मिळणेकामी तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुली व मुलांचे आई/वडील कोरोनामुळे मृत्यू झाल्याने त्यांच्या बालकांकरिता अर्थसहाय्य मिळणेबाबतचे अर्ज पनवेल महानगरपालिका महिला व बाल कल्याण विभागात उपलब्ध आहेत. सदरचा अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक १५/०१/२०२२ पर्यंत असेल मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

जा.क्र. पमपा/मबाक/४२२१/
प्र.क्र.१/१०३/२०२१
दिनांक ०३/१२/२०२१

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
सहा. आयुक्त
पनवेल महानगरपालिका

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
ई मेल पत्ता :- eepwdtribalthane@gmail.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- ०२२-२५४१००४६

**ई निविदा सूचना क्रमांक- १० सन २०२१-२२**

कार्यकारी अभियंता, सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे जिल्हा ठाणे महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडील वर्ग-२ व त्यावरील पात्र व सक्षम कंत्राटदाराकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध आहेत. (वरीलपैकी काही अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे यांनी रोखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.)

**कामाचे नांव :-** १) शासकीय आदिवासी आश्रमशाळा भिनार ता. भिवंडी, जि. ठाणे येथे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह इमारतीचे बांधकाम करणे अंदाजित किंमत :- रु. ७,४९,९९,८०२/-
२) शासकीय आदिवासी आश्रमशाळा सुसरवाडी ता.शहापूर, जि. ठाणे येथे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह इमारतीचे बांधकाम करणे अंदाजित किंमत :- रु. ७,४९,८७,७३६/-
३) शासकीय आदिवासी आश्रमशाळा पाथरज ता.कर्जत, जि.रायगड येथे शालेय इमारतीचे बांधकाम करणे. अंदाजित किंमत:- रु. ७,४९,८७,२७६/-
४) शासकीय आदिवासी आश्रमशाळा पिंगळस कर्जत, जि.रायगड येथे आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह इमारतीचे बांधकाम करणे अंदाजित किंमत :- रु. ७,४९,९९,६२७/-

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि. ०६/१२/२०२१ ते दि. ३०/१२/२०२१
ई-निविदा उघडणे : दि. ०३/०१/२०२२
निविदा पूर्व बैठक : मा. मुख्य अभियंता, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयात दि. २२/१२/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता (शक्य झाल्यास) किंवा ऑनलाईन

**खालील संकेतस्थळांवर ई-निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.**
१) http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे कार्यालयातील सूचना फलक
३) ई निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत निविदेमध्ये नमुद कागदपत्रांच्या हार्ड कॉपी १ (एक) प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सुचनेनुसार नमुद वेळेपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

जा.क्र.: साबां(आ)विठा/ठाणे/निविदा/क्रं.१०/२७४९/२०२१-२२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.(आदिवासी) विभाग,
ठाणे सा.बां. आवार, स्टेशन रोड, ठाणे-४०० ६०१.
दिनांक :- २९/११/२०२१

**सही/-**
कार्यकारी अभियंता,
सा.बां.(आदिवासी) विभाग, ठाणे

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M ) /DIVN/MHD/ Tech/Tender-29/2021-22 RFX No. 7000021528 Dtd. 03.12.2021** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for the work of AMC for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M DIV Mahad for the year 2021-22. | **Rs. up to 25,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST+1% Labour CESS.
Bid submission is **on or before 12.12.2021 up to 23:59 Hrs.**
For further details visit our website: - **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person: -** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**(Manoj V.Borse)**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn, Mahad**



**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. ४ डिसेंबर २०२१ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस**
**(वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. जुने ग्रामीण रुग्णालय, कोळीवाडा-उरण नाका, पनवेल
- ३. आय. टी. एम. कॉलेज, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १०. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १४. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली

**कोवॅक्सिन**

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. नागरी आरोग्य केंद्र-५, खारघर

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- जाधववाडी
- चाळ रा.जि.प. शाळा
- सागवाडी
- बीड रा.जि.प. शाळा
- तक्का प.म पा. शाळा
- खांदा गाव प.म.पा. शाळा
- रोडपाली बौद्धवाडी
- रोडपाली कातकरीवाडी मंदिर
- चाफेवाडी
- नौपाडा रा.जि.प. शाळा

# कोरोना लसीकरणाला पुन्हा गती

## ‘ओमायक्रॉन’च्या धास्तीने लाभार्थी रांगेत


(संग्रहित छायाचित्र)

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोरोना रुग्णसंख्या कमी झाल्याने कोविडविरोधी लसीकरण करून घेण्यासाठी काही प्रमाणात टाळाटाळ होत असल्याचे चित्र नुकतेच दिसत होते. नव्याने आढळलेल्या ओमायक्रॉन या कोरोनाच्या व्हेरिएंटमुळे मात्र सर्वांचीच झोप उडवली आहे. त्यामुळे लसीच्या दुसर्‍या डोससाठी व पहिल्या डोस ही पूर्ण न झालेल्या व्यक्ती लसीकरणासाठी रांगेत दिसत आहेत. असेच चित्र नवी मुंबईतही पहायला मिळाले.

पहिल्या लसमात्रेचे शहरातील लसीकरण पूर्ण झाल्यानंतर व करोना प्रादुर्भाव नियंत्रणात आल्याने दुसरी लसमात्रा घेण्यासाठी लस लाभार्थीकडून टाळाटाळ सुरू होती, मात्र गेली तीन-चार दिवस कोरोनाच्या ओमायक्रॉन या उत्परिवर्तित विषाणूच्या धास्तीमुळे पुन्हा एकदा लसीकरणाला वेग आला आहे. महापालिकेच्या ‘हर घर दस्तक’ अभियानाला चांगला प्रतिसाद मिळत असून आरोग्य केंद्रांवर रांगा लागल्याचे चित्र आहे.

नवी मुंबईत आतापर्यंत ११,७४,७६६ जणांनी पहिली तर ७,८६,३५६ जणांनी दोन्ही लसमात्रा घेतल्या आहेत. दुसरी लसमात्रा घेतलेल्यांचे प्रमाण एकूण लाभार्थीच्या तुलनेत अद्याप ७० टक्केपर्यंतच आहे. दिवाळीपूर्वी पालिकेकडे लस नव्हती मात्र लाभार्थी रांगेत होते. दिवाळीनंतर पालिकेकडे लस आहे, पण लाभार्थी लस घेण्यास येत नसल्याचे चित्र होते. पालिकेकेडे बुधवारपर्यंत एक लाखांपेक्षा अधिकच्या लसमात्रा शिल्लक आहेत. लाभार्थी लस घेण्यास येत नसल्याने पालिकेने घरोघरी जात शोध सुरू केला होता. ‘हर घर दस्तक’ अभियानांतर्गत घराजवळ लस उपलब्ध करून दिली होती. आता ओमायक्रॉन या उत्परिवर्तित विषाणूच्या प्रादुर्भावाची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे नवे निर्बंधही घालण्यात आले आहेत. त्यामुळे टाळाटाळ करणार्‍या लसलाभार्थीनी आता सुरक्षा म्हणून लसवंत होण्याला पसंती दिल्याचे दिसत आहे.

महापालिकेच्या आरोग्य केंद्रांसह लसीकरण केंद्रावर लाभार्थी लस घेण्यासाठी येऊ लागले आहेत. त्यामुळे लसीकरणाला आता गती मिळत आहे.

> **लाभार्थींनी आपल्या कोरोना लशीची पहिली मात्रा घेऊन विहित कालावधी पूर्ण झाल्यावर लगेच नजीकच्या महानगरपालिका लसीकरण केंद्रावर जाऊन दुसरी मात्रा घ्यावी. संपूर्ण लस संरक्षित होणे गरजेचे आहे.**
> **-डॉ. रत्नप्रभा चव्हाण, लसीकरण प्रमुख**

## परदेशातून आलेल्या व्यक्तींची माहिती पालिकेला कळवा -डॉ. कविता चौतमोल

**पनवेल : प्रतिनिधी**

ओमायक्रॉन या विषाणूची काही देशांमध्ये लागण झालेली असून पनवेल महापालिका क्षेत्रात याचे संक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता मागील १५ दिवसांत किंवा येणार्‍या काही दिवसात एखादा व्यक्ती परदेशातून आला असेल किंवा येणार असेल तर त्यांची इत्यंभूत माहिती गृहनिर्माण संस्थांनी महापालिकेला कळवावी, असे आवाहन महापौर डॉ. कविता चौतमोल व आयुक्त गणेश देशमुख यांनी नागरिकांना केले आहे.

दक्षिण आफ्रिकेत दक्षिण आफ्रिकेसह बोटस्वान, हाँगकाँग मध्ये आढळलेल्या ओमिक्रॉन या कोविडच्या नव्या व्हेरिएंटच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेने दक्षता घेण्याचे सूचित केले आहे. या पार्श्वभूमीवर परदेशातून येणार्‍या प्रवासींवर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. आयुक्त गणेश देशमुख यांनी पालिका क्षेत्रातील नागरिकांना महापालिका क्षेत्रात मागील १५ दिवसांत किंवा येणार्‍या काही दिवसात एखादा व्यक्ती परदेशातून आला असेल किंवा येणार असेल तर त्यांची संपूर्ण माहिती गृहनिर्माण संस्थांनी वॉररुमच्या ८९२८९३१०४१ व ८९२८९३१०५२ या क्रमांकावर कळवावी, असे आवाहन केले आहे. तसेच बेड उपलब्धी संबधितची माहितीही या क्रमांकावर उपलब्ध होणार आहे.

कोरोना बाधितांची दैनंदिन संख्या कमी झालेली दिसत असल्याने नागरिकांमध्ये कोविड सुरक्षा नियमांचे पालन कटाक्षाने केले जात नाही असे दिसून येत आहे, मात्र कोरोनाचा धोका अद्यापही पूर्णपणे टळलेला नाही हे प्रत्येकाने लक्षात घेऊन कोविड विषाणूची लागण होण्यापासून वाचण्यासाठी मास्क, सतत हात धुणे व सुरक्षित अंतर या कोविड सुरक्षा त्रिसूत्रीचेच पालन करणे महत्वाचे आहे. तसेच अजूनही कोविड लसीचे दोन्ही डोस ज्या नागरिकांचे पूर्ण झाले नाही अशा नागरिकांनी आपले लसीकरण पूर्ण करावे, असे आवाहनही पनवेल महापालिका महापौर व आयुक्तांनी केले आहे.

## वाल्मिकीनगरमध्ये बसवले गतिरोधक

### ■ नगरसेवक नितीन पाटील यांची तत्परता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील वाल्मिकीनगर परिसरात नगरसेवक नितीन पाटील यांच्या तत्परतेने व सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून गतिरोधक बसविण्यत आले आहेत. याबद्दल नागरिकांनी नगरसेवक पाटील यांचे आभार मानले.

पनवेल महापालिका प्रभाग १८ मधील स्वामी नित्यानंद मार्ग वरील वाल्मिकीनगर येथे वाहनांची गतिरोधक नसल्याने अतिशय वेगाने वाहतूक होत असते. त्यामुळे लहानमुले, ज्येष्ठ नागरिकांना ये-जा करण्यास त्रासाचे होते, म्हणून तिथे स्पीडब्रेकरची आवश्यकता असल्याची मागणी तेथील स्थानिकांनी भाजप पनवेल शहर सरचिटणीस तथा नगरसेवक नितीन जयराम पाटील यांच्या कडे केली. त्यांनी त्वरित महापालिकेला लेखी पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले व सातत्याने पाठपुरावा करून या ठिकाणी कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून गतिरोधक बसवून घेतले. त्यामुळे परिसरातील नागरिक, रहिवाश्यांनी नितीन पाटील यांचे आभार मानले.



## खारघरमध्ये उद्या रक्तदान शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खान्देश विकास फाऊंडेशन, नवी मुंबईच्या वतीने खारघरमध्ये रविवारी (दि. ५) सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबईवरील २६/११ या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीर जवानांच्या तसेच निष्पाप नागरिकांच्या व खान्देशातील मुंबई पोलीस दलातील शहीद योगेश पाटील यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी आणि थॅलेसिमिया ग्रस्त मुलांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. खारघर सेक्टर २१ मधील स्पंदन मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये होणार्‍या या रक्तदान शिबिरात नवी मुंबईतील रक्तदात्यांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करून या सामाजिक कार्यात सहभाग घ्यावा, असे आवाहन फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९९६७६६१८६२, ९०२२५६४२१४, ८१०८८९१९९९ या क्रमांकावर संपर्क साधावा, अशी माहिती फाऊंडेशनच्या वतीने देण्यात आली आहे.

## कामोठ्यातील बंद पथदिवे उजळले

### ■ नगरसेवक विकास घरत यांचा पाठपुरावा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठ्यामधील बंद अवस्थेत असलेले पथदिवे नगरसेवक विकास घरत यांनी पाठपुरावा करून चालू करून घेतले आहेत. त्यामुळे नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

कामोठे सेक्टर ३४, ३५, ३६ व सेक्टर १७, १८ मधील अनेक पथदिवे बर्‍याच दिवसापासून बंद होते. बंद पथदिव्यांमुळे रात्री पादचार्‍यांना रस्त्यावरून जाताना त्रास होत होता. लहान मुले वृद्ध आणि महिलांसाठी तर ते आणखीनच धोकेदायक होत होते. अनेक रहिवाशांनी सिडकोकडे तक्रारी करूनदेखील टोलवाटोलवी केली जात होती. अखेर काही नागरिकांनी नगरसेवक विकास घरत यांच्या लक्षात ही समस्या आणून दिली. नगरसेवक घरत यांनी नागरिकांच्या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन सिडकोकडे पाठपुरावा केला. त्यानुसार सिडकोच्या मार्फत त्यांनी स्वतः उभे राहून बरेचसे पथदिवे चालू करून घेतले. तसेच उर्वरित राहिलेले पथदिवेदेखील लवकरच सुरू करण्यात येतील, असे आश्वासन सिडको अधिकार्‍यांकडून घेतले. सेक्टर १७,१८,३४, ३५,३६ मधील रहिवाशांच्या वतीने नगरसेवक विकास घरत यांचे आभार मानण्यात आले आहेत.



## नवी मुंबई विमानतळ पुनर्वसन क्षेत्रात विकास प्रक्रियेला गती; सिडकोचा दावा

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोने पुनर्वसन क्षेत्रातीसाठी भारतीय विमान प्राधीकरणाचे इमारतीच्या अनुज्ञेय उंचीसंदर्भात २०१५ साली सरसकट ना-हरकत प्रमाणपत्र (ब्लँकेट एनओसी) घेतले होते. या एनओसीची वैधता २०२० मध्ये संपुष्टात आलेली होती. त्यामुळे मध्यंतरीच्या कालावधीत पुनर्वसन क्षेत्रात बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदारांना वैयक्तीकरित्या भारतीय विमान प्राधीकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावे लागत होते. सिडको प्रशासनाने भारतीय विमान प्राधीकरणाशी पाठपुरावा करून या ना-हरकत प्रमाणपत्रांचीची वैधता वाढविण्यात यश प्राप्त केले आहे, असे सिडकोने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

एकूण सहा ब्लँकेट एनओसीपैकी सेक्टर -१ (वडघर), सेक्टर २४ (वहाळ १), सेक्टर २५ (वहाळ २), सेक्टर २५ ए (वहाळ ३) व पुष्पक नगर या पाच क्षेत्रांना ना-हरकत प्रमाणपत्रांची वैधता जानेवारी ते मार्च २०२४पर्यंत वाढवून मिळाली आहे. शिवाय आर-१ ते आर-५ (वडघर १) या क्षेत्राच्या ना-हरकत प्रमाणपत्राची वैधता वाढवून मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे. ही मंजुरी लवकरच अपेक्षित आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१मध्ये ही वैधता वाढवून मिळाल्यानंतर सिडकोतर्फे पुनर्वसन व पुनःस्थापन क्षेत्रातील सात प्रस्तावांना बांधकाम परवानगी देण्यात आली आहे तसेच ३४ प्रस्तावांमध्ये भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले असल्याचेही सिडकोने नमुद केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या २ डिसेंबर २०२० रोजीच्या अधिसूचना क्र. टीपीएस-१८१८/सीआर-२३८/१८/सेक्टर ३७(१एए)/युडी-१३, अन्वये एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (युडीसीपीआर) सिडको क्षेत्रांकरीता लागु करण्यात आली आहे. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाच्या पुनर्वसन धोरणान्वये वितरीत करण्यात आलेले बहुतांशी भूखंड ४५० चौ.मी. क्षेत्रफळाच्या आतील असल्याने रो हाउस व सेमी डिटॅच (अर्ध अलिप्त) प्रकारच्या विकासासाठी पूर्वीच्या नियमावलीनुसार या भूखंडांवर एक बाजू किंवा दोन्ही बाजू सामाईक ठेवून परवानगी मिळावी यासाठी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांनी नगर विकास विभागास विनंती केली होती. या विनंतीस मंजुरी मिळाली असल्याने प्रकल्पबाधितांसाठी वाटप केलेल्या ४५० चौ.मीपर्यंत क्षेत्राच्या भूखंडामध्ये एक बाजू किंवा दोन्ही बाजू सामाईक ठेवून १३ मी. उंचीच्या मर्यादेत १.५ एफएसआयसह (पार्किंगसाठीच्या स्टील्ट मजल्याची उंची वगळता) परवानगी देण्यात येत आहे. शिवाय, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीच्या तरतुदींनुसार सिडकोच्या वसाहत विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त असल्यास वाढीव चटई क्षेत्र निर्देशांकासह विकास परवानगी देत आल्याचे सिडकोच म्हणणे आहे.

सिडकोने विकास परवानगी देणे बंद केले आहे अशा प्रकारच्या अफवा पसरविल्या जात आहेत. अशा अफवांना बळी न पडता आवश्यक त्या कागदपत्रांसह बांधकाम परवानगीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे आवाहन सिडकोच्या प्रसिद्धीपत्रकात करण्यात आले आहे.

> **सिडकोच्या सातत्याने केलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन व प्रकल्पबाधित नागरिकांच्या समस्या समजून घेऊन भारतीय विमानतळ प्राधिकरणातर्फे ६ पैकी ५ पॉकेट्ससाठी ना-हरकत प्रमाणपत्रे पुनर्प्रमाणित करण्यात आली. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे विमानतळ पुनर्वसन व पुनःस्थापन क्षेत्राच्या विकासाला गती प्राप्त होईल यात शंका नाही.**
> **-डॉ. संजय मुखर्जी, एमडी, सिडको**

## बीसीटी विधी महाविद्यालयात ऑनलाइन व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल येथील भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयाच्या चौथ्या कै. जनार्दन भगत स्मरणीय व्याख्यानमालेचे उद्घाटन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांचे हस्ते झाले.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांच्या संपूर्ण उपस्थितीतीस मज्ञाव असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता, न्यायाधीश, कायदेतज्ञ आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवर यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना, मिळावे यासाठी या व्याख्यानमालेचे आयोजन प्राचार्या डॉ. शितला गावंड यांच्या पुढाकाराने ऑनलाइन पध्दतीने, झुम मिटींग आणि युट्यूबच्या माध्यमातून करण्यात आले होते.




सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी या व्याख्यानमालेचे उद्घाटन करून चॅलेंजेस बिफोर लिगल अँड ज्युडिशियल सिस्टम ऑफ इंडिया या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी न्यायव्यवस्था बळकट करण्याबाबत सविस्तर माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांना ‘न्यायाधीश पद’ या पर्यायाचा गांभीर्याने विचार करण्याचा सल्ला दिला आणि न्यायदान केल्याचे समाधान खूप मोठे असून, जर कमी वयात न्यायाधीशपदी नियुक्ती झाली तर भविष्यात मिळणारे लाभ चांगले असल्याचे सांगितले.

या मालिकेतील दुसरे व्याख्यान व्याख्यान मुंबई उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ राम आपटे यांनी करंट सिनारीओ ऑफ कॉन्स्टीटयुशनल व्हॅल्यूज इन इंडिया या विषयावरदिलेआणि त्यानंतर तिसरे व्याख्यान मुंबई उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ सुदीप पासबोला यांनी ओव्हरव्ह्यू ऑफ क्रिमिनल ट्रायल्स या विषयावर दिले. सर्व व्यक्त्यांनी प्रत्येक व्याख्यानाच्या शेवटी प्रश्नोत्तरे सदरात विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

शेवटी जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या सदस्या अर्चना ठाकूर यांनी समारोपाचे मनोगत व्यक्त करताना विधी महाविद्यालयात पहिल्यांदाच सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीनी उपस्थिती नोंदवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यासाठी तसेच या वर्षी एलएलएम या अभ्यासक्रमास परवानगी मिळून पहिल्याच वर्षी सर्व जागा भरल्याबाबत महाविद्यालयाचे अभिनंदन केले. व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल सर्व वक्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

प्राचार्या डॉ. शितला गावंड यांनी उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्याचे आभार मानले आणि त्याचबरोबर वेळोवेळी मिळणारे योग्य मार्गदर्शन आणि पाठींबा यासाठी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख आणि संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य यांचे आणि महाविद्यालयाचा कर्मचारी वृंद, विद्यार्थ्यांचे आभार मानले. या वेळी विद्यार्थी, माजी विद्यार्थी, काही विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, तसेच अनेक वकील उपस्थित होते. व्याख्यानमालेच्या यशस्वीततेसाठी सहाय्यक प्राध्यापिका संघाप्रिया शेरे, कृपा नाईक, रॅव्हनिश बेक्टर, भाग्यश्री पाटील, धनश्री चौगुले, प्रियंका उंडे, ग्रंथपाल हितेश छत्तानी आणि मुटकोर्ट सचिव सुयश बारटक्के, फैजान शेख, समृद्धी टिवटणे यांचे मोलाचे योगदान लाभले.

## शंकरा आय हॉस्पिटलमध्ये ५०० मोतीबिंदू शस्त्रक्रिया

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्यावतीने दोन महिन्यांत रायगड जिल्ह्यातील ५०० रुग्णांच्या मोतिबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. हे नेत्र यज्ञाचे काम असेच सुरू रहाणार असल्याचे रूग्णालय प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल ट्रस्ट आणि शंकरा आय फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल येथे नागरिकांना सेवा देत आहे. शंकरा आय फाउंडेशन हे श्री कांची कामकोटी मेडिकल ट्रस्टचा एक भाग असून नेत्रचिकित्सेमध्ये ४४ वर्षे निरंतर काम केले आहे. तर आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल हे जागतिक दर्जाची नेत्रचिकित्सा सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यासाठी समर्पित आहे.

नवीन पनवेल शहराच्या मध्यभागी स्थापित केलेले हे सेवा केंद्र ८१ हजार ३६४ चौरस फुट जागेत विस्तारलेले असून यामध्ये एकाच छताखाली अत्याधुनिक व सर्व प्रकारच्या नेत्रसेवा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तसेच या सेवा केंद्रात दरवर्षी १५ हजार नेत्र शस्त्रक्रिया केल्या जाऊ शकतात. नवीन पनवेल येथील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल येथे सर्व प्रकारच्या सुविधा सुरु करण्यासाठी या कर्मचार्‍यांची पहिली बॅच सज्ज झाले आहे. या केंद्रासाठी आवश्यक असलेल्या या बॅचमधील सर्व कर्मचार्‍यांना गेल्या दोन वर्षांपासून कोईम्बतूर येथील शंकरा आय फाऊंडेशनच्या केंद्रात प्रशिक्षण दिले जात आहे.

शंकरा आय फाउंडेशन इंडिया यांच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महत्वाकांक्षी अशा वंदे मातरम या नेत्र आरोग्यसेवा कार्यक्रमाचे लक्ष्य भारतातील प्रत्येक राज्यात नेत्रसेवा पोहोचविणे हे आहे. आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल हे समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहचून जागतिक दर्जाच्या नेत्रसेवा किफायतशीर दरात उपलब्ध करून देईल. आवश्यक मूलभूत उद्देश्य, पारदर्शी दृष्टीकोन, एक अत्यंत कुशल व वचनबध्द टीम, प्रकिया व प्रणाली, आसपासच्या समुदायांचा पाठिंबा, उपक्रमाचा अविभाज्य भाग म्हणून मानव संसाधन विकास, सर्व आशिर्वाद व आचार्य यांचे संकल्प या सर्व गोष्टींना एकत्रित करून शंकरा यांनी देशातील एक प्रमुख डोळ्यांची देखभाल करणार्‍या संस्थेची निर्मिती केली आहे. नवीन पनवेल येथील हॉस्पिटलचे हे १२वे केंद्र आहे.

## केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांची जेएनपीटी बंदराला भेट

**उरण : वार्ताहर**

केंद्रीय बंदरे, जलवाहतूक व जलमार्ग आणि पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी भारताचे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट अर्थात जेएनपीटी बंदराचा दौरा केला. आपल्या भेटीदरम्यान त्यांनी बंदराच्या कामकाजाचे बारकाईने निरीक्षण केले आणि जागतिक सागरी व आयात-निर्यात समुदायास पुरविल्या जाणार्‍या बंदरातील जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि तांत्रिक प्रगतीबद्दल बंदर प्रशासनाची प्रशंसा केली.

जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांनी केंद्रीय राज्यमंत्र्यांचे बंदरात स्वागत केले. आपल्या भेटीदरम्यान मंत्री श्री. नाईक यांनी जेएनपीटीतील विविध टर्मिनल्सना भेट दिली व बंदराच्या भागधारकांशी संवाद साधला. बंदराच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी हाती घेतलेल्या अनेक तंत्रज्ञान-सक्षम ‘स्मार्ट पोर्ट उपक्रमां’विषयी माहिती घेतली.

दौर्‍याच्या सुरुवातीला झालेल्या बैठकीदरम्यान जेएनपीटीच्या अधिकार्‍यांनी मंत्र्यांना बंदराच्या भविष्यातील विस्तार योजनांची माहिती दिली, तसेच जेएनपीटीने नुकतीच सुरू केलेली ‘ड्वार्फ कंटेनर ट्रेन’ सेवा, कोस्टल बर्थ, ग्रीन पोर्ट इनिशिएटिव्ह, मल्टी-प्रॉडक्ट एसईझेड, सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा, ड्राय पोर्ट्स, डिजिटायझेशन इनिशिएटिव्ह यासह विविध उपक्रमांची, प्रकल्पांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

## संपादकीय

# पुन्हा प्रश्नांचे मोहोळ

कोरोना महामारीच्या प्रारंभीच्या काळात जसे असंख्य प्रश्नांचे मोहोळ जगभरातील सर्वसामान्यांच्या, सरकारांच्या आणि संशोधकांच्याही समोर उभे ठाकले होते, तशीच परिस्थिती आता आहे. सध्या दिल्या जाणाऱ्या लसी कोरोनाच्या ओमायक्रॉन या नव्या विषाणू प्रकाराला अटकाव करण्यात यशस्वी ठरतील का की सध्याच्या लसीकरणात काही बदल करावे लागतील? सर्वांसाठी बूस्टर डोसचा विचार करावा लागेल का? लहान मुलांचे काय, त्यांचे लसीकरण तातडीने सुरू केले जावे का, यांसारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे एकीकडे शोधत दुसरीकडे ओमायक्रॉनच्या फैलावाला शिताफीने अटकाव करावा लागणार आहे.

**कोरोनाच्या ओमायक्रॉन या नव्या विषाणू प्रकाराने बाधित झालेले दोन रुग्ण कर्नाटकात सापडल्याने आणि त्यापैकी एक जण तेथून दुबईला निघूनही गेल्याने एकंदरच संबंधित परिस्थितीविषयी देशात घबराटीचे वातावरण आहे. मुळात जागतिक स्तरावरही अद्याप ओमायक्रॉन या व्हेरिएंटविषयी पुरेशी माहिती संशोधकांना मिळालेली नाही. विषाणूच्या या प्रकाराचा फैलाव वेगाने होत असला, तरी त्याचा संसर्ग होणाऱ्यांमध्ये मृत्यूचे प्रमाण खूप अधिक असल्याचे अद्याप दिसलेले नाही अशा आशयाच्या बातम्या वा संदेश समाजमाध्यमांवर फिरत असले, तरी यासंदर्भात ठामपणे काही विधाने करता येतील इतपत आकडेवारी आणि विश्लेषण संशोधकांकडे उपलब्ध झालेले नाही. नव्या विषाणूप्रकारामुळे जगभरातच घबराट आणि गोंधळाचे वातावरण मात्र आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाले, तर १५ ऑगस्टपासून राज्यात हळूहळू निर्बंध शिथिल होऊन जनजीवन सुरळीत होण्याच्या दिशेने सरकू लागले होते. आता सारे काही पूर्ववत होईल, गेल्या वर्ष-दीड वर्षातील नुकसान भरून काढण्याच्या दृष्टीने किंवा स्वत:ला सावरण्याकरिता पुन्हा एकदा जोमाने हातपाय हलवण्याचे प्रयत्न सर्वसामान्यांनी मोठ्या उमेदीने सुरू केले होते, परंतु गेल्या आठवडाभरात सुरू झालेली ओमायक्रॉनची चर्चा एव्हाना अगदी खालच्या स्तरातील सामान्यातील सामान्य माणसापर्यंत पोहोचली आहे. पुन्हा एकवार कठोर लॉकडाऊन लागेल की काय याच्या नुसत्या कल्पनेनेही हे सर्वसामान्य धास्तावत असल्याचे जाणवते आहे. लोकांच्या मनातील ही भीती लक्षात घेऊन सरकारी यंत्रणेकडून घबराट निर्माण न होण्याची विशेष दक्षता घेतली जाण्याची गरज आहे. अर्थात कोरोनाच्या संकटातून संधी साधण्यात धन्यता मानणारे महाराष्ट्रात या घबराटीला कितपत अटकाव करणार हाही एक मोठा प्रश्नच आहे. मुंबई विमानतळावर १० नोव्हेंबरपासून हजारभर प्रवासी दक्षिण आफ्रिकेतून आले आहेत असे घबराटीत भर घालणारे दावे यापूर्वीच राज्यातील जबाबदार पदांवरील व्यक्तींकडून करण्यात आले आहेत. या विशिष्ट विषाणू प्रकाराच्या केसेस देशात सापडणे आणि संबंधित रुग्णांच्या संपर्कात आलेल्यांचा शोध घेणे हे एका तऱ्हेने कोरोना महामारीच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण करून देणारेच आहे. कर्नाटकातील रुग्णाचे प्रकरण हेच अधोरेखित करते. दक्षिण आफ्रिकेतून व्यवसायधंद्यानिमित्त आलेला हा प्रवासी विमानतळावरच पॉझिटिव्ह ठरतो काय आणि अवघ्या तीन दिवसांत कुठल्याशा खाजगी लॅबकडून निगेटिव्ह रिपोर्ट घेऊन आणखी चार दिवसांनी दुबईला निघूनही जातो काय, हे सारेच एकीकडे गूढ संबोधले जात असले, तरी पूर्ववत होऊ लागलेल्या परिस्थितीत यंत्रणांमध्ये अशा तऱ्हेची ढिलाई येणे अनपेक्षित नाही. अर्थात अनपेक्षित नसले तरी त्याचा सहज स्वीकारही करता येणार नाही. ओमायक्रॉनचा फैलाव रोखण्यासाठी अवघ्या देशानेच पुन्हा एकदा कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांचे कठोर व काटेकोर पालन करणे आवश्यक दिसते आहे.**

# पालीत रस्त्याशेजारील विक्रेत्यांना हवी हक्काची जागा

**खबरबात**
**धम्मशील सावंत**

सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका आहे. पाली हे तालुक्याचे मुख्यालयाचे ठिकाण आहे. सर्वच शासकीय व निमशासकीय कार्यालये येथे आहेत. गावाची लोकसंख्या देखील जवळपास १५ हजाराच्या वर आहे. परिणामी आजुबाजूच्या परिसरातील लोकांना पालीत रोजगार व व्यवसायाच्या संधी अधिक आहेत. त्यामुळेच शेजारील गावातील शेतकरी व प्रामुख्याने आदिवासी आपल्या शेतात व परसबागेत पिकविलेला भाजीपाला, फळे व फुले घेऊन पालीत विकण्यासाठी नित्यनेमाने येतात, मात्र या हातावर पोट असलेल्या विक्रेत्यांना पालीत व्यवसाय करण्यासाठी बसण्याची हक्काची जागा नाही. रस्त्याच्या कडेला जागा मिळेल तिथे हे विक्रेते आपला माल विकण्यासाठी बसतात. परिणामी त्यांची मोठी गैरसोय होते. त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. हे रस्त्यावरील विक्रेते व ग्राहक यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना व पादचाऱ्यांना मार्ग काढणे देखील अवघड होते आणि परिणामी वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिक जटील बनतो. ज्याप्रमाणे सुधागड तालुक्यात मच्छीमार्केट व मटण मार्केट आहे, त्याप्रमाणे भाजीमार्केट देखील असावे, अशी मागणी मागील अनेक वर्षे आदिवासी बांधव करीत आहेत, मात्र या मागणीकडे कुणीही लक्ष देत नसल्याचे समोर आले आहे, पावसाळ्यात व इतर मोसमात रानभाज्या, कंदमुळे मोठ्या प्रमाणात विक्रीला येतात, मात्र हक्काची बाजारपेठ नसल्याने आदिवासी बांधव जागा मिळेल तिथे बसतात. परिणामी जागेअभावी व्यवसायाला फटका बसतो, भाजी नाशवंत असल्याने वेळेत विक्री होत नाही व या भाजीविक्रेत्यांना मोठे नुकसान सोसावे लागते.

पालीत प्रामुख्याने बाजारपेठ, मिनिडोअर स्टँड रस्ता ते पाली बस स्थानक, गांधी चौक, जुने एसटी स्टँड, मारुती मंदिर नाका व मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात फळभाजी विक्रेते रस्त्याच्या कडेला विक्रीसाठी बसतात. रस्त्याच्या कडेला त्यांना पुरेशी जागादेखील नसते, मात्र नाईलाजाने त्यांना तिथे बसावे लागते. प्रामुख्याने आदिवासी महिला सकाळी अगदी पहाटे लवकर उठून गावठी भाजीपाला, फुले, आंबे, काजूगर, कोकम, आंबे आणि रानमेवा यापैकी जे असेल ते टोपलीत टाकून ती टोपली डोक्यावर घेऊन पालीकडे यायला निघतात. स्थानिक मासेमार देखील गोड्या पाण्यातील मच्छी विक्रीसाठी आणतात. यांना आदिवासीवाडी पाड्यावरून मुख्य रस्त्यावर पायपीट करत यावे लागते. त्यानंतर भेटेल त्या गाडीत बसून पालीत येतात. आणि रस्त्याच्या बाजूला आपला माल घेऊन बसतात. रस्त्याच्या कडेला एखाद्या झाडाखाली किंवा दुकानाच्या शेडखाली नाहीतर मग मोकळ्या जागेत या महिला विक्रीसाठी ठाण मांडतात, तर काही जण हातगाडीवर आपला माल विकतात. सध्या उन्हाळा सुरू असल्याने या उन्हाचा खूप त्रास या विक्रेत्यांना होतो. पिण्याचे पाणी आणि खाण्यापिण्याची देखील अबाळ असते. दैनंदिन विधी आटोपण्यासाठी देखिल त्यांची खूप परवड होते. कारण पालीत सार्वजनिक स्वच्छतागृह नाहीत. अनेक ग्राहक किंमत पाडून माल विकत घेतात. बहुतांश माल हा नाशवंत असल्याने संध्याकाळी परतताना कवडीमोल भावात द्यावा लागतो. काही वेळेस दुकानदार आपल्या दुकानाबाहेर या विक्रेत्यांना बसू देत नाहीत, तर अनेक जणांच्या जागा ठरलेल्या असल्याने दुसऱ्या कोणाला ते तिथे बसू देत नाहीत. अशा परिस्थितीत मग विक्रेते आणि ग्राहक यांची रस्त्याच्या बाजूला रेलचेल असते. त्यामुळे वाहतुकीवर परिणाम होतो. परिणामी या सगळ्यावर रामबाण उपाय म्हणजे या विक्रेत्यांना शासनाकडून हक्काची जागा देणे. जेणेकरून नियमित हे विक्रेते त्या ठिकाणी बसून आपला माल विकतील, तसेच या ठिकाणी शासनाने छत, बसण्यासाठी कोबा, स्वच्छतागृह, विजेची व पाण्याची व्यवस्था अशा काही मूलभूत सोयी-सुविधा देखील उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आणि या बदल्यात अत्यल्प कर किंवा भाडे शासनाने घेतले, तर विक्रेते काही हरकत घेणार नाहीत. या हक्काच्या जागेत एकाच ठिकाणी सर्व विक्रेते आल्याने ग्राहकांना देखील तिथे जाणे सोपे होईल, त्यांना एका छताखालीच विविध वस्तू खरेदी करता येतील. त्याचबरोबर या विक्रेत्यांची वणवण आणि परवड थांबेल. त्यांची उत्पादने देखील सुरक्षित राहतील आणि त्यांच्यामुळे निर्माण होणारे प्रश्न देखील आपोआप मिटतील.



### मोक्याची जागा हवी

***पालीतील भाजी मार्केटची जागा फारशी मोठी नाही. तिथे काही थोडेच विक्रेते बसतात. रस्त्यावर विक्री करणाऱ्या फळ-भाजीपाला विक्रेत्यांना हक्काची जागा उपलब्ध करून द्यायची असेल, तर त्यासाठी मोकळी व मोक्याची जागा आवश्यक आहे. शासकिय किंवा गावठाण जागेचा वापर यासाठी होऊ शकतो, मात्र त्यासाठी शासकिय व ग्रामपंचायतीची इच्छाशक्ती आणि त्याबरोबरच पुरेसा निधी आवश्यक आहे.***

## पिण्याचे पाणी मागण्याच्या बहाण्याने नेरळमध्ये नऊ ठिकाणी चोरी

**कर्जत : बातमीदार**

नेरळ गावातील विविध भागांत १९ आणि २० नोव्हेंबर रोजी महिलांच्या एका टोळीने पिण्यास पाणी पाहिजे, असा बहाणा करून चोऱ्या केल्या होत्या. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात १ डिसेंबर रोजी वेगवेगळे नऊ गुन्हे दाखल झाले आहेत. नेरळ पोलीस त्या महिला चोरांचा शोध घेत आहेत.

नेरळ पोलीस ठाणे हद्दीत २० नोव्हेंबर रोजी मोहाचीवाडी नेरळ येथे आरोपी महिलांनी फिर्यादी यांच्या घरी पायरीवर उभे राहून पाणी आणण्यासाठी सांगितले. पाणी आणण्यासाठी महिला घरात गेल्या असता आरोपी महिलांनी संगनमत करून एकूण ४४ हजार २०० रुपये किमतीचे सोन्याचे मणी आणि अन्य वस्तू चोरून नेल्या. त्याच दिवशी मोहाचीवाडी साई मंदिराच्या मागे असलेल्या घरात सहा हजार रुपये किमतीचे चांदीचे पैजण व बाजूस एकूण एक हजार रुपये किमतीची भांडी या वस्तू चोरून नेण्यात आल्या. तेथील आणखी एका घटनेत चांदीचे पैंजण व बाजूस भांडी असा ऐवज चोरी झाला होता.

अशाच प्रकारे मोहाचीवाडी येथील समाधान चाळीत सोन्या-चांदीचे दागिने व अन्य वस्तू आणि साई मंदिर येथेही दागिने व भांडी पळविण्यात आली होती. या प्रकरणी नेरळ पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक सचिन गावडे अधिक तपास करीत आहेत.

## मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण सुधारित कार्यक्रमास मुदतवाढ

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्रीय निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार १ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार याद्यांचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम निर्धारित केला आहे. या कार्यक्रमानुसार निर्धारित दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधीस मुदतवाढ दिली आहे.

आता दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी कालावधी १ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर, दावे व हरकती निकालात काढणे २० डिसेंबरपर्यंत व मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी ५ जानेवारी २०२२ केली जाईल.

# मतदार नोंदणी करूया... मताधिकार बजावूया!

**मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांची जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी घेतलेली मुलाखत...**

**प्रश्न : मतदाराला नाव नोंदणीचा अर्ज कशाप्रकारे सादर करता येतो?**

उत्तर : मतदार म्हणून नाव नोंदवण्यासाठी अर्ज क्र. ६ आहे. ज्याला आपलं नाव नोंदवायचं आहे, त्याने हा अर्ज भरणं आवश्यक आहे. या अर्जासाठी चार दस्तावेज आवश्यक असतात, एक फोटो, वयाचा एक पुरावा, निवासाचा एक पुरावा, आणि कुठल्या मतदारसंघात अद्याप नाव नोंदणी झालेली नाही याचे प्रतिज्ञापत्र लागते, असे हे एकूण चार दस्तावेज आहेत. तसेच, ती व्यक्ती भारताचा नागरिक असणं अनिवार्य आहे. हा अर्ज ऑनलाइन भरता येतो किंवा आपल्या जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयातही जाऊन भरता येतो.

**प्रश्न : काही कारणांनी या पुनरीक्षण कार्यक्रमात नाव नोंदणी करता आली नाही तर नंतर त्याला कधी नोंदणी करता येते?**

उत्तर : ५ जानेवारी रोजी सुधारित अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतरही नवीन मतदार नोंदणी सातत्याने केली जाते आणि त्यांचं अद्ययावतीकरणही केलं जातं. त्या वर्षभरात हाच अर्हता दिनांक प्रमाण मानून नाव नोंदणी करून घेतली जाते. ज्यांची नोव्हेंबरमध्ये संधी जाईल त्यांना नंतरही नोंदणी करता येते.

निरंतर पुनरिक्षणामध्ये मतदार नोंदणी करता येते. पण, आगामी काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपालिका निवडणुकीत मतदान करता येण्यासाठी ३० नोव्हेंबर २०२१पर्यंत मतदान नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. जे नवमतदार १ जानेवारी २०२२ रोजी १८ वर्षे पूर्ण करणार आहेत, त्यांनी दि. ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत नावनोंदणी केल्यास त्यांचे नाव याच मतदार यादीत घेतले जाईल. तेव्हा १ जानेवारी २०२२च्या आधी १८ वर्षे पूर्ण केलेल्या मतदारांनी तातडीने आपल्या जवळच्या मतदार नोंदणी कार्यालयात जाऊन किंवा NVSP पोर्टलवर जाऊन ऑनलाइन नोंदणी करावी. तसेच, आपल्या मृत नातेवाईकांचे नाव वगळण्यासाठी, दोन ठिकाणी नावे नोंदवली गेली असल्यास एक नाव रद्द करण्यासाठी त्वरित संबंधित अर्ज भरावा.

**प्रश्न : मतदार याद्यांच्या अद्ययावतीकरणाबद्दल काय सांगाल?**

उत्तर : लोकशाही शासन पद्धतीचे पहिले वैशिष्ट्ये आहे निवडणुका... मतदार याद्या या निवडणुकांचा प्राण आहेत. मतदार याद्या जितक्या अचूक, निर्दोष, शास्त्रीय असतील तितक्या निवडणुका पारदर्शक होतात. यासाठी लोकशाही शासन व्यवस्थेत प्रत्येक पात्र नागरिकाने रोजच्या कामाच्या घाईतून वेळ काढून आपली नावनोंदणी करावी. त्याचबरोबर मतदार यादीत नाव नोंद झाल्याची खात्री करावी.

**प्रश्न : स्त्रियांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयीची जाणीव-जागृती निर्माण करण्यासाठी प्रशासनाच्या वतीने कोणत्या प्रकारचे प्रयत्न केले जातात?**

उत्तर : १६ नोव्हेंबरच्या विशेष ग्रामसभांमध्ये मोठ्या प्रमाणात महिला सहभागी झाल्या. आपली निम्मी लोकसंख्या स्त्रियांची आहे, त्यामुळे त्यांच्या नाव नोंदणीसाठी प्रशासनाच्या वतीने विशेष प्रयत्न केले जातात. गावात नव्याने लग्न होऊन आलेल्या स्त्रियांची नोंदणी, तसेच लग्न होऊन इतरत्र गेलेल्या स्त्रियांच्या नावांची वगळणी करण्यात येत आहे. स्त्रियांसाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्था, बचत गटातील स्त्रिया, अंगणवाडी सेविकांची यासाठी मदत घेतली जात आहे.

**प्रश्न : तरुण मतदारांच्या जागृतीसाठी काय प्रयत्न केले जातात?**

उत्तर : नव्याने मतदार म्हणून पात्र तरुण हा मोठ्या प्रमाणात महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत आहे. महाविद्यालयामध्ये ऑनलाइन फॉर्म भरण्याविषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे. मतदार यादीत युवांची नाव नोंदणी कमी झाल्याचे दिसते. लोकसंख्येत दिसणाऱ्या या वयोगटातील युवांनी मतदार नोंदणी करणं आवश्यक आहे.

**प्रश्न : दिव्यांग मतदारांना सहजपणे मतदार नोंदणी करता येण्यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने कोणती सुविधा आहे?**

उत्तर : भारत निवडणूक आयोगाने दिव्यांग मतदारांसाठी खास PWD या ॲपची सोय केलेली आहे. या ॲपवरून दिव्यांग मतदारांना नाव नोंदणी करता येईल. तसेच त्यांनी आधी नोंदणी केली असेल, पण दिव्यांगत्व म्हणून नोंद केली नसेल, अशा व्यक्तींनाही या ॲपवरून त्यांचे दिव्यांगत्व चिन्हांकित करता येईल. एकदा असे दिव्यांगत्व चिन्हांकित झाले की, त्यांना मतदानाच्या वेळी आवश्यक सुविधा- पोस्टल मतपत्रिका, चाकाची खुर्ची, वाहन या सुविधा पुरवणे प्रशासनाला सोयीचं होतं.

**प्रश्न : मतदारांना नाव नोंदणीसाठी अन्य काही सुविधा आहे का?**

**उत्तर : मतदार नाव नोंदणीसाठी ऑनलाईन किंवा ऑफलाईन पर्याय वापरता येतील :**

१. National Voter Service Portal (www.nvsp.in)

२. Voter Portal Beta (https://voterportal.eci.gov.in/)

३. Voters Helpline App (VHA) मोबाइल ॲप

४. संबंधित मतदार नोंदणी कार्यालय

ऑनलाइन पद्धतीने मतदार नोंदणी कशी करावी, नाव वगळणी कशी करावी, याबाबतचे व्हिडीओ CEO Maharashtra या यू-ट्यूब चॅनलवर उपलब्ध आहेत.

विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत २७-२८ नोव्हेंबर २०२१ या दिवशी जिल्ह्यात नाव नोंदणीची शिबिरे आयोजित केली गेली. या शिबिरांतर्गत वंचित घटकांच्या नाव नोंदणीसाठी विशेष प्रयत्न केले गेले.

**प्रश्न : विशेष पुनरिक्षण मोहिमेच्या निमित्ताने जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून मतदारांना आपण काय आवाहन कराल?**

उत्तर : दि. १ जानेवारी २०२२ रोजी १८ वर्ष पूर्ण होणाऱ्या किंवा त्यापेक्षा अधिक वय असणाऱ्या आणि अद्याप नाव नोंदणी न केलेल्या सर्व नागरिकांनी मतदार म्हणून नाव नोंदणी करावी. त्याचबरोबर अर्ज क्र. ७ भरून मृत नातेवाईकांचे नाव वगळावे, तसेच आपण कायमस्वरूपी अन्य मतदारसंघात स्थलांतर केले असेल, तर आधीच्या ठिकाणचे नाव वगळून नवीन ठिकाणी नाव नोंदणी करावी. ज्या मतदारांची दोन ठिकाणी नाव नोंदणी असेल त्यांनी एका ठिकाणचे नाव वगळावे. नाव नोंदणी, वगळणी, पत्त्यात बदल यासर्व बाबी आता घरबसल्या ऑनलाइन पद्धतीनेही करता येतात.

लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक मतदाराने आपला मताधिकार वापरणं गरजेचं आहे. या हक्काचा वापर करण्यासाठी सर्वप्रथम मतदार यादीत नावनोंदणी करणे आवश्यक आहे, यासाठी मतदार नोंदणी करूया आणि मताधिकार बजावू या! **(समाप्त)**

# कुणबी समाजाने संघटित होणे काळाची गरज -महादेव बक्कम



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

समाजाची घडी विस्कटता कामा नये, त्यासाठी समाज बांधवांनी संघटित होणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेव बक्कम यांनी गुरुवारी (दि. २) येथे केले.

माणगाव तालुका कुणबी समाज विकास मंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवारी येथील कुणबी भवनात समाज बांधवांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात महादेव बक्कम उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. समाजाचे प्रश्न सुटत नसतील तर आपण मोर्चे काढू, त्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे, असे ते म्हणाले.

ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाली नाही त्यांनी आपले प्रस्ताव ग्रुप अध्यक्षांकडे द्यावेत, त्यांना कर्जमाफी मिळवून देण्यासाठी आपण सर्व जण ताकद लावू, असे बक्कम यांनी या वेळी सांगितले. वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. दुपारी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या मेळाव्याला रामभाऊ टेंबे, शैलेश भोनकर, शांताराम भोरावकर, काका नवगणे, राजराम वाढवळ, राजाराम टेंबे, भागोजी डवले, सुरेश वडेकर, टिकम भोनकर, नथुराम पाष्टे, संदेश मालोरे, सतीश पवार, दशरथ वाढवळ, संतोष भात्रे, बाळकृष्ण काप, श्रीपद भोनकर, वसंत वाढवळ आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोविड लस घेण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई

## जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिली माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

ओमायक्रॉन विषाणू प्रादुर्भाव होऊ नये यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने अत्तापासूनच सावधगिरी बाळगण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ज्या अधिकारी, कर्मचारी यांनी अद्यापपर्यंत कोरोना प्रतिबंधक लस घेतलेली नाही त्यांना लस घेणे बंधनकारक केले असून, जे अधिकारी, कर्मचारी वैद्यकीय कारणाशिवाय लस घेण्यास टाळाटाळ करतील त्यांच्याविरुद्ध शिस्तभंग कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्हा परिषदेतील सर्व खातेप्रमुख व पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना बजावले आहे.

ओमायक्रॉन विषाणू हा कोविड १९ चा नवीन प्रकार असून, जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्युएचओ) मते हा प्रकार व्हायरसच्या वर्तनातच बदल करतो. कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती असलेल्या व्यक्तींसाठी हे खुप धोकादायक आहे. ओमीक्रोनची लक्षणे दिसुन येणाऱ्या लोकांचे लसीकरण झालेले नाही. ही बाब शास्त्रज्ञांना प्रथम दर्शनी आढळून आलेली आहे. त्यामुळे ओमीक्रोन प्रकारच्या कोरोना रुग्णांमध्ये झपाटयाने वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ओमीक्रोनचा संसर्ग टाळण्यासाठी सावधगिरी बाळगणे आवश्यक असल्याने जिल्हा परिषद अंतर्गत कामकाज करणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांना लसीकरण पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अद्याप लसीचा पहिला डोस घेतलेला नाही तसेच पहिला डोस घेतला आहे, परंतू विहित कालावधी उलटून गेला असूनही दुसरा डोस घेणे आवश्यक असतानादेखील वैद्यकीय कारणांशिवाय दुसरा डोस जाणुनबुजून घेतलेला नाही. अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांमुळे ओमायक्रॉन विषाणूचा संसर्ग वाढण्याची दाट शक्यता आहे. कामानिमित्त इतर ठिकाणांहून जिल्हा परिषदेच्या जिल्हास्तर आणि पंचायत समिती स्तरावरील कार्यालयामध्ये कामकाजासाठी येणाऱ्या अभ्यागतांना संसर्ग होऊ नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्याच्या कार्यक्षेत्रातील नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात संपर्क साधून लसीकरण पूर्ण करून घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

जिल्हा परिषदेमधील सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी लसीकरण करून घेतले आहे किंवा नाही याची खातरजमा करावी. ज्या अधिकारी, कर्मचारी यांनी अद्याप लसीकरण पुर्ण करुन घेतले नाही अशा अधिकारी, कर्मचारी यांचा अहवाल आरोग्य विभागाकडे सादर करावा. तसेच संबंधित कार्यालय प्रमुखांनी आपल्या कार्यालयातील लसीकरणाचा पहिला डोस न घेतलेल्या आणि दुसऱ्या डोस साठीचा विहित कालावधी संपुष्टात येऊन ही वैद्यकीय कारणाशिवाय दुसरा डोस अद्याप घेतला नाही अशा अधिकारी, कर्मचारी यांच्या विरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावा, अशा सूचना डॉ. किरण पाटील यांनी दिल्या आहेत.

# विकासकामांवरून आमदार भरत गोगावले यांचा राष्ट्रवादी, शेकापला टोला

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील अनेक रस्ते राज्य सरकारकडे वर्ग करून त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणायचे काम आम्ही शिवसेनेच्या माध्यमातून करीत असताना पाच-दहा लाख रुपयांची कामे करणाऱ्यांची टीमकी वाजवायची, हा दिशाभूल करण्याचा प्रकार बंद झाला पाहिजे, असा टोला आमदार भरत गोगावले यांनी राष्ट्रवादी काँग्रेस व शेकापला रायगड जिल्हा परिषदेच्या चरई प्राथमिक शाळा येथे बोलताना लगावला.

पोलादपूर शहरानजीकच्या चरई ग्रामपंचायत हद्दीतील विविध विकासकामांच्या उद्‌घाटनप्रसंगी आ. गोगावले बोलत होते. या वेळी आ. गोगावले यांच्यासोबत व्यासपीठावर राजिप सदस्य चंद्रकांत कळंबे, पंचायत समिती सदस्य यशवंत कासार, गटविकास अधिकारी जगताप, विभागप्रमुख लक्ष्मण मोरे, माजी राजिप महिला बालकल्याण सभापती संगीता कासार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता सुर्वे, स्थानिक सरपंच अनिता साळवी, उपसरपंच सुशांत कदम, निलेश कंक, तसेच विविध प्रभागांतील ग्रामस्थ महिला आदी उपस्थित होते.

# नागोठणे व्यापारी पतसंस्था आदर्श पतसंस्थेत विलीन

**अलिबाग : प्रतिनिधी**

नागोठणे व्यापारी सहकारी पतसंस्था नागोठणे ही आर्थिक बाबतीत अतिशय सुस्थितीत असलेली, प्रतिष्ठित व्यापारी नरेंद्र जैन व सहकारी संचालक यांच्या नेतृत्वाखाली उत्तम प्रकारे चालू असलेली पतसंस्था आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये विलीन झाली आहे.

आपल्या भागातील सहकार क्षेत्रासाठी ही एक आश्वासक घटना आहे. नागोठणे व्यापारी पतसंस्थेच्या सभासदांना व संचालक मंडळाला ही पतसंस्था एखाद्या चांगल्या, नावाजलेल्या पतसंस्थेत विलीन करण्याची गरज भासत होती. तसा प्रस्ताव त्यांनी आदर्श पतसंस्थेसमोर मांडला. हा प्रस्ताव आदर्श पतसंस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात येऊन विलीनीकरण प्रस्ताव सहकार विभागाकडे पाठविण्यात आला होता. दि. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी राज्याचे अप्पर निबंधक डॉ. पी. एल. खंडागळे यांनी विलीनीकरणाचा आदेश दिला असल्याचे आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश पाटील यांनी सांगितले. या विलिनीकरणामुळे नागोठणे व्यापारी पतसंस्थेचे ठेवीदार व कर्जदार आणि कर्मचारी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. यापुढे त्यांना आदर्श पतसंस्थेच्या सभासदांप्रमाणे व कर्मचाऱ्यांप्रमाणे सर्व लाभ मिळणार आहेत. या विलिनीकरणामुळे रायगडच्या सहकार क्षेत्रात एक चांगला संदेश जाणार आहे.

## -: जाहीर सूचना :-

**सर्व हितसंबंधित व्यक्तींना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ चे रुंदीकरण करण्यासाठी पेण तालुक्यातील मौजे कर्नाळा, ता. पनवेल व मौजे खारकोलेटी, ता. पेण या गावातील जमिनी संपादीत होत आहेत. त्याबाबत राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ चे कलम ३A अधिसूचना मराठी व इंग्रजीमध्ये भारत राजपत्रात दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध झालेली आहे. या अधिसूचनेवर हरकती असल्यास दिनांक ०५/०१/२०२२ पर्यंत सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पेण विभाग पेण यांचे कार्यालयात दाखल कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.**

**स्थळ :- पेण**

**दिनांक :- ०२/१२/२०२१**

**सही/-**
**(विठ्ठल इनामदार)**
**सक्षम प्राधिकारी तथा**
**उपविभागीय अधिकारी पेण**
**उपविभाग पेण**

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 | REGD. No. D. L.-33004/99

सत्यमेव जयते

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-17112021-231197
**CG-DL-E-17112021-231197**

**असाधारण**
**EXTRAORDINARY**

**भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)**
**PART II—Section 3—Sub-section (ii)**

**प्राधिकार से प्रकाशित**
**PUBLISHED BY AUTHORITY**

**सं. 4392] नई दिल्ली, मंगलवार, नवम्बर 16, 2021/कार्तिक 25, 1943**
**No. 4392] NEW DELHI, TUESDAY, NOVEMBER 16, 2021/KARTIKA 25, 1943**

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**

**अधिसूचना**

नई दिल्ली, 16 नवम्बर, 2021

**का.आ. 4758(अ).**—केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम 1956 (1956 का 48) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा 3क की उप-धारा (1) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात्कि महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 0.00 सेकि.मी.84.00 (पनवेल इंदापुर सेक्शन ) तक के भू-खण्ड के निर्माण (चौड़ीकरण/पेव्ड शोल्डर सहित 2-लेन/4-लेन का बनाना आदि), अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो उक्त भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (1) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आपत्ति सक्षम प्राधिकारी, अर्थात सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पेण को लिखित रूप में प्रस्तुत की जाएगी और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप में या किसी विधिक पेशेवर द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आपत्तियों की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात्, यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक समझे, आदेश द्वारा या तो आपत्तियों को अनुज्ञात कर सकेगा या अननुज्ञात कर सकेगा।

उक्त अधिनियम की धारा 3ग की उप-धारा (2) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।

इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है।

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्य के रायगड जिले में NH66 के कि.मी. 0.00 से कि.मी.84.00 (पनवेल इंदापुर सेक्शन) के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण।**

| राज्य का नाम: महाराष्ट्र | जिले का नाम: रायगड | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| तालुक का नाम: पनवेल | | | | | |
| गांव का नाम: कर्नाळा | | | | | |
| 1 | 154 / 3 | निजी | वेट | 0.0180000(हेक्टेयर ) | 0.0180000 |
| तालुक का नाम: पेण | | | | | |
| गांव का नाम: खारकोलेटी | | | | | |
| 1 | 41 / 2 | निजी | वेट | 0.0110000(हेक्टेयर ) | 0.0110000 |
| | | | कुल | 0.0290 | 0.0290 |

[फा. सं. NHAI/BOT-I/11013/18/2006,NHAI/BOT-I/11013/20/2007/3A]

राजेश गुप्ता, निदेशक

**MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHWAYS**

**NOTIFICATION**

New Delhi, the 16th November, 2021

**S.O. 4758(E)**.—In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways Act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said Act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for building (widening/two lane with paved shoulder/four laning etc.,), maintenance, management and operation of NH66 in the stretch of land from Km. 0.00 to Km. 84.00 (Panvel - Indapur section) in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

Any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, object to the use of such land for the aforesaid purpose under sub-section(1) of section 3C of the said Act.

Every such objection shall be made to the Competent Authority, namely, Competent Authority and Sub Division Officer , Pen Shashkiya Vasahat area, Mumbai Goa National Highway No. 66, Pen in writing and shall set out the grounds thereof and the Competent Authority shall give the objector an opportunity of being heard, either in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent Authority thinks necessary, by order, either allow or disallow the objections.

Any order made by the Competent Authority under sub-section (2) of section 3C of the said Act shall be final.

The land plans and other details of the land to be acquired under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent Authority.

**SCHEDULE**

**Brief Description of the land to be acquired with or without structures falling On NH66 in the stretch of land from Km. 0.00 to Km. 84.00 (Panvel - Indapur section) of NH66 in the district of RAIGAD in the state of MAHARASHTRA**

| State: MAHARASHTRA | District: RAIGAD | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl.No. | Survey / Plot Number | Type of Land | Nature of Land | Area (in Local Unit) | Area (in Hectare) |
| Taluk: Panvel | | | | | |
| Village: Karnala | | | | | |
| 1 | 154 / 3 | Private | WET | 0.0180000(Hectare ) | 0.0180000 |
| Taluk: Pen | | | | | |
| Village: Khar Koleti | | | | | |
| 1 | 41 / 2 | Private | WET | 0.0110000(Hectare ) | 0.0110000 |
| | | | Total | 0.0290 | 0.0290 |

[F. No. NHAI/BOT-I/11013/18/2006,NHAI/BOT-I/11013/20/2007/3A]

RAJESH GUPTA, Director

# पहिल्या दिवसअखेर भारत ४ बाद २१४ धावा

**भारत-न्यूझीलंड कसोटी**

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना आजपासून मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवला जात आहे. आज या सामन्याचा पहिला दिवस होता. पावसामुळे उशिरा सुरू झालेल्या या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, मात्र तोपर्यंत पहिलं सत्र वाया गेलं होतं. त्यामुळे आज केवळ दोन सत्र खेळवण्यात आली आहे. यामध्ये भारताने ७० षटकांमध्ये ४ गड्यांच्या बदल्यात २१४ धावा केल्या आहेत. मयंक अग्रवालच्या शतकाच्या जोरावर भारताने पहिला दिवस आपल्या नावे केला.

नाणेफेक जिंकून कर्णधाराने घेतलेला फलंदाजीचा निर्णय भारतीय सलामीवीरांनी योग्य ठरवला. मयंक अग्रवाल आणि शुभमन गिल या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ८० धावांची भागीदारी केली. मात्र न्यूझीलंडचा फिरकीपटू एजाज पटेलने भारताची बिनबाद ८० वरून ३ बाद ८० अशी अवस्था करून ठेवली. त्याने आधी ४४ धावांवर असलेल्या शुभमन गिलला बाद केलं. त्यानंतर एजाजने एकाच षटकात चेतेश्वर पुजारा आणि विराट कोहली या दोघांना पव्हेलियनचा रस्ता दाखवला. पुजारा आणि कोहली भोपळादेखील फोडू शकले नाहीत. त्यानंतर आलेल्या श्रेयस अय्यरलादेखील एजाजने फार वेळ मैदानात टिकू दिलं नाही. अय्यर १८ धावांवर बाद झाला. त्यानंतर मैदानात उतरलेल्या रिद्धिमान साहाने पडझड होऊ दिली नाही. अग्रवाल आणि साहा या दोघांनी ५ व्या विकेटसाठी आतापर्यंत नाबाद ६१ धावांची भागीदारी रचली आहे.

## मुंबईचा एजाज न्यूझीलंडच्या जर्सीत

*न्यूझीलंडचा खेळाडू एजाज पटेलचा जन्म मुंबईतच झाला. त्याचे कुटुंब १९९६ मध्ये मुंबईपासून दूर न्यूझीलंडमध्ये स्थायिक झाले होते. आता 'आमची मुंबई'मध्ये एजाज न्यूझीलंडच्या कसोटी जर्सीत दिसत आहे. एजाजने आपल्या छोट्या कारकिर्दीत न्यूझीलंडमधील काही संस्मरणीय कामगिरी केली आहे. कानपूर येथील पहिल्या कसोटीत रचिन रवींद्रसोबत एजाजने जवळपास नऊ षटकांची भागीदारी केली, ज्यामुळे पाहुण्या संघाने हा सामना वाचवला होता.*

## अंपायरच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह

*विराट कोहली फलंदाजी करण्यास आल्यावर तो केवळ चार चेंडू खेळला आणि शून्यावर बाद होत पवेलियनमध्ये परतला. कोहली चौथा चेंडू खेळत असताना तो एकाच वेळेस पॅड आणि बॅटला लागला होता, मात्र अंपायरने त्याला बाद घोषित केलं. त्यामुळे कोहलीला तंबूत परतावं लागलं, मात्र अंपायरच्या या निर्णयावर अनेक दिग्गज खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली आहे, अशा वेळी अंपायरने कॉमन सेन्स वापरायला हवा होता, असं मत अनेकांनी व्यक्त केलं आहे. त्यामुळे अंपायरच्या या निर्णयावरून सवाल उपस्थित होत आहेत.*

## आरोग्य प्रहर



### हिवाळ्यात होणाऱ्या सर्दीसाठी खास उपाय

हिवाळा म्हटलं की, मस्त थंडगार वातावरण या हंगामात आपल्याला पर्यटनस्थळांना भेट देण्यास आवडते. तसेच या हंगामात आपण गरमा-गरमा तेलकट तळलेले विविध पदार्थांचा आहारामध्ये देखील समावेश करतो. हिवाळ्यात खाणे-पिणे, नवीन कपडे घालणे आणि फिरणे यात एक वेगळाच आनंद असतो. पण या हिवाळ्यात रोगाचा प्रादूर्भाव वाढतो. सर्दी, खोकला याची समस्या या हंगामात वाढते. म्हणून या हंगामात शरीराची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

सर्दी आणि खोकल्यासाठी एक किंवा दोन आठवडे नियमित औषध घेऊ शकता. पण सर्दी-खोकला केवळ औषधोपचाराने बरा होऊ शकत नाही. त्याऐवजी खाण्याकडे लक्ष द्यावे लागेल. रेफ्रिजरेटेड पाणी, थंड पेय किंवा थंड अन्न खाणे पूर्णपणे टाळले पाहिजे. त्याऐवजी तुमच्या आहारात गरम पदार्थ, फळे आणि भाज्यांचा समावेश करा.

या हंगामात बाजारात विविध प्रकारच्या भाज्या मिळतात. त्यामुळे भाजी किंवा चिकन सूप तुम्ही घरी तयार करू शकता. सूपमध्ये तेल खूप कमी वापरा. त्यामुळे पचन लवकर होते. भाज्या आणि चिकन सूप नियमित बनवा आणि खा. यामुळे हिवाळ्याच्या हंगामात ही तुम्ही निरोगी राहाल.

लसूण खाद्यपदार्थांमध्ये वापरला की कोणत्याही पदार्थाची चव बदलते. लसूण आपल्या आरोग्यासाठी देखील खूप फायदेशीर आहे. लसणामुळे रोगप्रतिकारक शक्तीही वाढण्यास मदत होते. कच्चा लसूण देखील वजन कमी करण्यास मदत करतो. यामुळे आपल्या दररोजच्या आहारामध्ये लसणाचा समावेश करा.

हिवाळ्यात विविध पालेभाज्या बाजारपेठेमध्ये मिळतात. ब्रोकोली ही भाजी आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. ब्रोकोली सूप, सलाड आवडेल ते खा. ब्रोकोलीमधील व्हिटॅमिन ई आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. तसेच मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

# अंजू जॉर्ज ॲथलेटिक्समधील सर्वोत्कृष्ट महिला पुरस्काराने सन्मानित

**मोनॅको : वृत्तसंस्था**



भारताच्या माजी लांबउडीपटू अंजू बॉबी जॉर्ज यांची जागतिक ॲथलेटिक्स संघटनेकडून वर्षांतील सर्वोत्कृष्ट महिला या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. देशभरात युवा पिढीला घडवण्याबरोबरच लिंग समानतेसाठी सातत्याने पुढाकार घेतल्याने ४४ वर्षीय अंजू यांना २०२१ या वर्षांतील सर्वोत्तम महिलेचा बहुमान मिळाला आहे.

अंजू यांनी २००३ मध्ये झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक कांस्यपदकाची कमाई केली होती. जागतिक स्पर्धेत पदक जिंकणाऱ्या त्या अद्यापही भारताच्या एकमेव ॲथलेटिक्सपटू आहेत. बुधवारी युरोपमधील मोनॅको शहरात झालेल्या आभासी पुरस्कार वितरण सोहळ्यात अंजू यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. ॲथलेटिक्ससाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या महिलांचा हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो.

'जागतिक ॲथलेटिक्स संघटनेने मला या पुरस्कारासाठी पात्र समजल्याने मी त्यांचे आभार मानते. ज्या क्षेत्राने आपली ओळख निर्माण केली. त्यासाठी योगदान देण्याचा आनंद निराळाच आहे. माझ्या कार्याची दखल घेऊन अनेक युवा मुलींना प्रेरणा दिल्याबद्दल धन्यवाद,' असे 'ट्वीट' अंजू यांनी केले. अंजू यांची गतवर्षी भारतीय ॲथलेटिक्स महासंघाच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. २०१६ मध्ये त्यांनी ॲथलेटिक्सच्या अकादमीची स्थापना केली. काही महिन्यांपूर्वीच झालेल्या २० वर्षांखालील मुला-मुलींच्या जागतिक स्पर्धेत अंजू याची शिष्य शैली सिंगने रौप्यपदकावर नाव कोरले होते. अंजू यांच्या कार्यामुळे भारतीय महिलांचे नवे प्रतीक उदयास आले आहे, असे मत केंद्रीय क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी व्यक्त केले.

# मिशन ऑलिम्पिक समितीमध्ये अंजली, तृप्ती, वीरेन, मोनालिसा यांचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**





टोकियो ऑलिम्पिकनंतर २०२४च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये दिमाखदार यश मिळवण्याच्या इराद्याने गुरुवारी (दि. २) केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने मिशन ऑलिम्पिक समितीमध्ये माजी नेमबाज अंजली भागवत, माजी बॅडमिंटनपटू तृप्ती मुरगुंडे, माजी हॉकीपटू वीरेन रस्किन्हा आणि माजी टेबल टेनिसपटू मोनालिसा मेहता यांच्यासह सात जणांचा समावेश केला आहे. मिशन ऑलिम्पिक समिती लक्ष्य ऑलिम्पिक व्यासपीठ योजनेंतर्गत (टॉप्स) भारतीय ऑलिम्पिकपटूंच्या तयारीसाठी आर्थिक मदत करते. माजी फुटबॉलपटू बायच्युंग भूतिया, माजी लांब उडीपटू अंजू बॉबी जॉर्ज आणि माजी हॉकी कर्णधार सरदार सिंग या अन्य तिघांचा समितीमध्ये समावेश करण्यात आला आहे. यंदा टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने विक्रमी सात पदकांची कमाई केली. यानंतर पॅरालिम्पिक स्पर्धेत १९ पदकांची लयलूट केली.

# हार्दिक म्हणतो, आता नो रिटर्न...!

## मुंबई इंडियन्सने संघाबाहेर केल्यानंतर दिले संकेत

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबई इंडियन्सने आयपीएल २०२२ हंगामासाठी त्यांच्या कायम ठेवलेल्या खेळाडूंची घोषणा केली आहे. कर्णधार रोहित शर्मासह जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव आणि कायरन पोलार्ड यांना कायम ठेवण्यात आले आहे. यामध्ये हार्दिक पांड्या आणि कृणाल पंड्या यांच्या नावाचा समावेश नाही. पंड्या बंधू दीर्घकाळापासून या संघाचा भाग आहेत. हार्दिकने २०१५ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण केले होते. येथून त्याने आपले नाव कमावले आणि घातक अष्टपैलू खेळाडूंमध्ये त्याची गणना होते. मुंबईतून बाहेर झाल्यानंतर हार्दिकने एक व्हिडिओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये त्याने असे संकेत दिले आहेत, की तो कदाचित या संघात परत येणार नाही.

हार्दिकने २०१५, २०१७, २०१९, २०२० मध्ये मुंबईसह आयपीएलचे विजेतेपद पटकावले. एक भावनिक व्हिडिओ शेअर करत तो म्हणाला, हे क्षण मी कायम माझ्याजवळ ठेवीन. मी इथे जी मैत्री केली आहे, जी नाती बांधली आहेत, लोक आहेत, चाहते आहेत, त्यांचा मी सदैव ऋणी राहीन. मी केवळ एक खेळाडू म्हणून नाही तर माणूस म्हणूनही सुधारलो आहे. मी युवा क्रिकेटपटू म्हणून येथे मोठ्या स्वप्नांसह आलो. आम्ही एकत्र जिंकलो, आम्ही एकत्र हरलो, आम्ही एकत्र लढलो. या संघासोबत घालवलेला प्रत्येक क्षण माझ्या हृदयात आहे. प्रत्येकजण म्हणतो की चांगल्या गोष्टींचा अंत व्हायला हवा, पण मुंबई इंडियन्स नेहमीच माझ्या हृदयात राहील.

# दुसऱ्या कसोटीतून अजिंक्य राहणेला वगळलं

**मुंबई : प्रतिनिधी**

अजिंक्य राहणेचं कसोटी करिअर धोक्यात आलं आहे का? असा सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे. कारण मुंबईत होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यात अजिंक्य राहणेला संघातून वगळून बाहेर बसवण्यात आलं आहे. कानपूर येथील गेल्या कसोटी सामन्यात राहणे कर्णधारपद संभाळताना दिसून आला, मात्र त्याला मुंबईतील कसोटीत स्थान मिळवता आलं नाही. पहिल्या कसोटी सामन्याच्या वेळी कर्णधार विराट कोहली आराम करत होता, त्यामुळे टीमची धुरा राहणेकडे दिली होती. शिवाय राहणेला विराट कोहलीच्या अनुपस्थित कसोटी क्रिकेटच्या कर्णधारपदाचा चांगला अनुभवही आहे.

अजिंक्य राहणेला बाहेर बसवण्याचं कारण दुखापत जरी सांगितलं असलं तरी सर्वांनाच माहीत आहे, गेल्या काही दिवसांपासून राहणेचा खेळ काही खास नाही. राहणेच्या खात्यात गेल्या कित्येक दिवसांपासून मोठ्या रन्स नाहीत. दुसरीकडे टीममध्ये दाखल झालेला युवा खेळाडू श्रेयस अय्यरने पहिल्याच कसोटी सामन्यात शतक ठोकत सर्वांच्या नजरा वळवल्या. विराट कोहली दुसऱ्या कसोटी सामन्यात परत आला, त्यामुळे कुणाला ना कुणाला बाहेर बसावंच लागणार होतं. शेवटी अजिंक्य राहणेला दुसऱ्या कसोटीतून वगळण्यात आलं.

# आरसीबीचा यजुर्वेंद्र चहलला धक्का

## मागील कामगिरी चांगली असतानाही नो रिटेन


**मुंबई : प्रतिनिधी**



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने आयपीएल २०२२साठी केवळ तीन खेळाडूंना कायम ठेवले आहे. आरसीबीने विराट कोहली, ग्लेन मॅक्सवेल आणि मोहम्मद सिराज यांना कायम ठेवले आहे. आरसीबी संघात हर्षल पटेल, यजुर्वेंद्र चहल, देवदत्त पडिक्कल असे खेळाडू होते, ज्यांची मागील कामगिरी उत्कृष्ट होती, पण त्यांना कायम ठेवण्यात आले नाही. चहल अनेक वर्षांपासून आरसीबीची महत्त्वाचा भाग होता, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही त्याचे नाव आहे. असे असूनही त्याला संघाकडून सोडण्यात आले.

पुढील आयपीएल भारतात होणार आहे, अशा स्थितीत फिरकीपटूंची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यामुळे चहलवर मेगा ऑक्शनमध्ये मोठी बोली लागण्याची चिन्हे आहेत. चहलने आरसीबीच्या निर्णयावर मोठी प्रतिक्रिया दिली आहे. इतक्या वर्षांच्या पाठिंब्याबद्दल त्याने आरसीबीचे आभार मानले. तो ट्विटरवर म्हणाला, आरसीबी सर्व गोष्टींसाठी धन्यवाद.

आरसीबीने विराट कोहलीला १५ कोटी रुपयांमध्ये कायम ठेवले आहे. त्याच्याशिवाय ग्लेन मॅक्सवेलला ११ कोटी आणि मोहम्मद सिराजला ७ कोटींमध्ये कायम ठेवण्यात आले आहे. चौथ्या खेळाडूचा पर्यायही असताना आरसीबीने तीन नावांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला. आता प्रश्न पडतो की, चहलला एवढे महत्त्व असतानाही संघात का राखले नाही? आरसीबीला चहलला कायम ठेवायचे होते, पण हे प्रकरण पैशांमुळे अडकले. चहलला जास्त किंमत हवी होती, अशा स्थितीत चहलला रिटेन करणे शक्य नव्हते.



बोर्ली पंचतन : पावसाळी वातावरणामुळे आभाळात ढगांची गर्दी झाली असून त्यातून उगवणाऱ्या सूर्याने बोर्ली-म्हसळा मार्गावरील आसमंतात केलेली रंगांची उधळण मनाला मोहून टाकते. (छाया : अमेय नाझरे)

# आत्मचरित्रात रैनाचे धक्कादायक खुलासे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा माजी फलंदाज सुरेश रैनाने त्याच्या 'बिलिव्ह' या आत्मचरित्रातून क्रिकेट कारकिर्दीतील अनेक मोठे खुलासे केले आहेत. रैनाने त्याच्या लखनऊच्या वसतिगृहातील रॅगिंगची भीषणता सविस्तरपणे सांगितली आहे.

तो म्हणाला, इथे अशी मुलं सिनियर्सचं खास टार्गेट असायची, जी अभ्यासात आणि खेळातही हुशार असायची. सिनियर्स ज्युनियर मुलांना त्यांची वैयक्तिक कामे करायला लावायचे. रॅगिंगच्या वेगवेगळ्या पद्धती वापरल्या जायच्या. हॉस्टेलच्या दिवसात ज्या लोकांनी माझे आयुष्य नरक बनवले, ते मला अनेकदा भेटले. आता त्यांना माझ्याशी बोलून आनंद होतोय, असेही रैनाने म्हटले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com